# पंढरी संचार

• पंढरपूर • मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २६२





राजकारणाची दशा आणि दिशा बदलली का? (खास लेख) PII



'स्वेरी'च्या विद्यार्थ्यांनी घेतला'परीक्षा पे चर्चा २०२५' लाईव्ह उपक्रमाचा ... PIII


## At a Glance

### ४ वर्षांच्या चिमुकलीसह महिलेची आत्महत्या



**सांगोला :** पतीने गळफास घेऊन शुक्रवारी जीवनयात्रा संपवली होती. पत्नीने तिस-याच दिवशी चार वर्षांच्या मुलीसह गावातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. रविवारी सकाळी विहिरीत दोघींचे प्रेत पाण्यावर तरंगत असल्याचे समजताच गावातील युवकांनी कुर्डुवाडी पोलिसांना माहिती दिली. घाटणे येथे ६ फेब्रुवारी रोजी युवक हरिदास जानू लोंढे याने गळफास लावून आत्महत्या केली व जनाबाई लोंढे यांनी चार वर्षाच्या मुलीसह विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली आहे.

### राहुल सोलापूरकर यांना अटक करा



**सोलापूर :** छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल वारंवार बदनामीकारक वक्तव्य करणाऱ्या राहुल सोलापूरकर यांना त्वरित अटक करावी अशा मागणीचे निवेदन आज उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले. निवेदन देताना शहर प्रमुख महेश धाराशिवकर, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, लहू गायकवाड यांच्यासह अन्य शिवसैनिक उपस्थित होते.

### तळे हिप्परगा ग्रामपंचायतीने केला आदर्श ठराव



**सोलापूर :** सोलापुरातील तळे हिप्परगा ग्रामपंचायतीने एक ठराव पास केला आहे. या ठरावाचे संपूर्ण राज्यात कौतुक केले जात आहे. ज्या मुलांना आपल्या वृद्ध आई-वडिलांना सांभाळणार नाहीत त्यांना ग्रामपंचायतीच्या सुविधा दिल्या जाणार नाहीत, असा ठराव ग्रामपंचायतीने केला आहे. ग्रामपंचायतीने केलेल्या या ठरावाचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले आहे.

### सांगोल्यात उपसा सिंचन योजनेच्या कामाचे भूमिपूजन



**सांगोला :** स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या पहिल्या टप्प्यातील तीनशे कोटी रुपयांच्या कामाचा भूमिपूजन राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते चिकमहूद येथे होणार असल्याची माहिती माजी आमदार शहाजी पाटील यांनी दिली. माजी आमदार पाटील म्हणाले, की सन २००० साली ७८ कोटी ५९ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता या योजनेला मिळाली होती. परंतु पुढील पाच वर्षे या योजनेवर कोणताही खर्च झाला नसल्याने २००५ साली प्रशासकीय मान्यता रद्द झाली. २०१९ साली आमदार झाल्यानंतर आपण या योजनेच्या मंजुरीसाठी प्रयत्न सुरू केले.

## चंद्रकांतदादा पाटील यांचा धाडसी निर्णय

# नागरी सुविधांसाठी समांतर यंत्रणा उभारणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेत गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकराज असल्याने नागरिकांचे प्रश्न सोडविण्यात प्रशासनाला सपशेल अपयश आले आहे; त्यामुळे नागरिकांना महापालिकेत हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे कोथरुडचे आमदार आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी अफलातून आयडिया लढविली असून नागरिकच आता त्यांचे प्रश्न मार्गी लावणार असून या नागरी सुविधा मिळविण्यासाठी समांतर यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

महापालिका प्रशासनाला आणि मूलभूत व्यवस्थेला समांतर अशी खाजगी यंत्रणा उभारून कोथरूडकरांचे प्रश्न संपविण्यात यावे अशी धाडसी घोषणा आज चंद्रकांत पाटील यांनी केली.



कोथरूडमध्ये स्वप्रशिल्प सोसायटीसहित तारा रेसिडेन्सी करिष्मा कुमार अशा १५ सोसायटीने एकत्रित येऊन समूहसंघ स्थापन केला आहे या सर्व सोसायटीतील नागरिकांच्या प्रश्नांसाठी आज नामदार पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते.

या बैठकीमध्ये अनेक सोसायटी धारक आणि नागरिकांनी विविध प्रश्नांचा भडीमार नामदार पाटील यांच्यावरती केला वर्षानुवर्षी एखाद्या ठिकाणचा पालापाचोळा कचरा उचलला जात नाही येथ पासून ते बांधकामांच्या राडारोडा ते अनधिकृत पार्किंग आणि अनधि कृत टपऱ्या यांच्या वाढत्या समस्यांबाबत » पान ३ वर



> “महापालिकेत प्रशासक असल्याने नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि विकासासाठीही काही प्रमाणात मर्यादा येत आहेत, त्यातूनच नागरिकांचे विशेषत: ज्येष्ठांचे हाल होत आहेत. त्यांची या अडचणीतून मुक्तता व्हावी यासाठीच हा निर्णय घेण्यात आला आहे; त्यासाठी ही योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचा आम्ही गांभीर्याने विचार करत आहे."
> **— चंद्रकांतदादा पाटील,** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

## सूर्यघर योजनेस जिल्ह्यात चांगला प्रतिसाद; ९ हजार अर्ज दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत देशातील एक कोटी कुटुंबांना दरमहा 300 युनिट मोफत वीज देण्याची योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केली आहे या योजनेस सोलापूर जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळाला असून 9000 जणांनी अर्ज दाखल केले आहेत दिवसेंदिवस विजेला मागणी वाढत आहे मात्र विजेची निर्मिती जास्त प्रमाणात होत नसल्यामुळे वीज टंचाई भासत आहे यामुळे विज टंचाईवर मात करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम सूर्यघर योजना सुरू केली आहे या योजनेअंतर्गत सौर ऊर्जेद्वारे विजेचे निर्मिती करण्यात येत आहे या योजनेसाठी नागरिकांना 50 ते 80 हजार रुपयापर्यंत अनुदान देण्यात येत आहे यामुळे या योजनेस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे सोलापूर जिल्ह्यात या योजनेसाठी 9000 नागरिकांनी अर्ज दाखल केले आहेत त्यातील 7994 अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे यातील 3557 घरामध्ये सूर्यघर योजना सुरू झाली आहे तर 3935 घरामध्ये सूर्यघर योजना अंतर्गत सौर ऊर्जा पॅनल बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे सोलापूर जिल्ह्यात सूर्यघर योजनेस चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे नागरिकांना 300 युनिट पर्यंत मोफत वीज वापरता येणार आहे



# सरगम चौक ते कॉलेज चौक धुळीचे साम्राज्य; नागरिक हैराण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सरगम चौक ते कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय दरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. हा रस्ता कॉक्रिटीकरण करण्यात आला आहे. मात्र रस्त्यावर ठेकेदाराने पाणी न मारल्यामुळे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. धुळीचा त्रास नागरिक, विद्यार्थी, वाहन चालक यांना सहन करावा लागत आहे. आषाढी यात्रेत संतांचे पालखी सोहळे देहू आळंदी येथून पंढरपूरला येतात. पालखी सोहळ्यात लाखो भाविक सहभागी झालेले असतात. यामुळे पालखी मार्गावर मोठ्या प्रमाणावर



भाविकांची गर्दी असल्यामुळे भाविकांना सुरक्षित रस्त्यावरून जाता यावे म्हणून शासनाने आळंदी ते पंढरपूर पालखी मार्ग केला आहे. या मार्गाचे 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. सध्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय ते सरगम चौक या रस्त्याचे रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येत आहे. मात्र काम निकृष्ट दर्जाचे केले असल्यामुळे रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. याचा त्रास महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी नागरिक व वाहन चालकांना सहन करावा लागत आहे. तरी बांधकाम विभागाने लक्ष देऊन रस्त्यावर धूळ उडू नये याची खबरदारी घेण्याचे आदेश ठेकेदारांना द्यावेत अशी मागणी होत आहे. » पान ३ वर



### उजनी धरणाचे दरवाजे १५ फेब्रुवारीला बंद होणार !

**सोलापूर :** शेतीसाठी उजनी धरणातून ४ जानेवारीला सोडलेले पाणी १५ फेब्रुवारीला बंद होणार आहे. आता धरणात एकूण पाणीसाठा १०० टीएमसी असून त्यात उपयुक्त साठा ३६.४० टीएमसीपर्यंत आहे. सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरणात सध्या १०० टीएमसी पाणी असून मागील पाच-सहा वर्षांत पहिल्यांदाच फेब्रुवारीतही धरणात ३६ टीएमसीवर उपयुक्त पाणीसाठा आहे.

## ५४२७ मालमत्ता धारकांना नगरपरिषदेकडून जप्तीच्या नोटीसा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर शहरातील २१ हजार ९०० मालमत्ताधारकांकडे नगरपरिषदेची ३१ मार्च अखेर १४ कोटी १८ लाख २४ हजार रुपये थकबाकी आहे. यातील ५४२७ मालमत्ताधारकांना थकबाकी भरावी अन्यथा जप्तीची कारवाई करण्यात येईल अशा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

नगरपरिषदेकडून १ मार्चपासून थकबाकी वसुलीची मोहीम सुरू करण्यात येणार आहे. पंढरपूर नगरपरिषद मालमत्ताधारकांकडून घरपट्टी व पाणीपट्टी वसुली करते. ३१ मार्च २०२५ पर्यंत २५ कोटी ५३ लाख ७६ हजार रुपये थकबाकी होती. जानेवारी २०२५ पर्यंत ११ कोटी ३५ लाख ५२ हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत. आणखी १४ कोटी १८ लाख २४ हजार रुपये मालमत्ता धारकांकडे थकबाकी आहे. यामुळे ही थकबाकी वसुली करण्यासाठी मुख्याधिकारी प्रशांत जाधव, उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकरकर, अधिकारी सुप्रिया शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ३५ अधिकारी व कर्मचारी यांची टीम तयार करण्यात आली असून १ मार्चपासून वसुली मोहीम सुरू करण्यात येणार आहे.

५० हजार रुपयेपेक्षा जास्त रक्कम असणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता जप्तीची नोटीस बजावण्यात आली आहे. तर दहा हजारापेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या मालमत्ता धारकांचे नळ कनेक्शन कट करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांनी कर भरून नगर परिषदेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## पंढरपूर तालुक्यात रब्बी हंगामात 954 शेतकऱ्यांनी उतरविला पिक विमा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** रब्बी हंगामात केंद्र व राज्य शासनाने शेतकऱ्यांना पिक विमा उतरविण्याचे आवाहन केले होते. यास पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून 954 शेतकऱ्यांनी 1700 हेक्टर वरील पिकाचा विमा उतरविला आहे.




शेतकरी, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार यांच्याकडून रक्कम घेऊन शेतात पिकांची लागवड करतात. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान झाल्यानंतर शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. मात्र कर्जाची वसुलीसाठी तगादा लावला जातो. यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलतात. म्हणून केंद्र व राज्य शासनाने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी एक रुपयात पिक विमा योजना सुरू केली आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांनी एक रुपया भरून शेतातील पिकाचा विमा उतरवायचा आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणार आहे. यामुळे पंतप्रधान पिक विमा योजनेस शेतकऱ्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पंढरपूर तालुक्यातील 954 शेतकऱ्यांनी 1700 हेक्टरवरील गव्हू, कांदा, हरभरा, ज्वारी, तेलबिया, कापूस, मका आदी पिकांचा विमा उतरविला आहे. सोलापूर जिल्ह्यात 96000 शेतकऱ्यांनी एक लाख 45 हजार हेक्टर वरील पिकाचा विमा उतरविला आहे. जिल्ह्यात शेतकऱ्यांकडून पिक विमा योजनेस चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून येत आहे.

## लोहार समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** शहर उत्तर मतदार संघामध्ये लोहार समाज हा मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून या समाजाला विकासात्मक असे आजपर्यंत काहीही मिळालेले नाही. समाज मंदिर सुद्धा या समाजाच्या नावावरती नाही. त्यामुळे समाजाच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असून समाजाच्या सर्व अडचणी सोडवून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्न करेन अशी ग्वाही शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिली. लोहार समाजाच्या वतीने विश्वकर्मा जयंती निमित्त पार्क चौक येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार देशमुख बोलत होते.

## सत्कार....

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**पंढरपूर :** महान शिवभक्त पूज्य श्री दादा महाराज गुरव गोरेगांव वांगी, ता. खटाव, जि. सातारा यांनी आज श्री पांडुरंगाचे दर्शन घेऊन गेल्या अनेक वर्षापासून चालत आलेली आपली माघी यात्रेची परंपरा पूर्ण केली. पूज्य दादामहाराज हे श्री दत्त भगवान व श्री. वेताळबाबांचे परमभक्त मानले जातात. दै.पंढरी संचारचे संपादक बाळासाहेब बडवे यांनी त्यांचा शाल,श्रीफळ व रामायण ग्रंथ भेट देऊन सत्कार केला.

## नगर परिषदेच्या वतीने शहरातील कचरा उचलण्या सोबतच

# युद्धपातळीवर जंतुनाशक फवारणी काम सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर शहरामध्ये दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी एकादशी सोहळा संपन्न झाला माघी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी देश विदेशातून व संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. या यात्रा कालावधीत सुमारे ३ ते ४ लाख वारकरी-भाविक दर्शनासाठी आले आहेत. या येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पंढरपूर नगर परिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी पंढरपूर शहर लवकरात लवकर स्वच्छ होण्याच्या दृष्टीने विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात यावी अश्या सूचना दिल्या आहेत त्या नुसार युद्ध पातळीवर विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी दिली.



माघी यात्रा कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपूर शहरामध्ये दाखल झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर व शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. यात्रा नंतर बहुतेक द्वादशी दिवशी शहरातील कचरा उचलण्याचे काम हाती घेण्यात येत परंतु यावर्षी वाहने प्रदक्षिणा मार्ग व इतर ठिकाणी जाण्यास अडचण नसलेने मठामध्ये व परिसरात साठलेला कचरा गोळा करण्याचे काम लगेच हाती घेण्यात आले आहे. » पान ३ वर

## कॅमेरे लावले वाघासाठी अन् आढळला बिबट्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** वाघाच्या सततच्या हल्ल्यांमुळे धाराशिव जिल्हा आणि बार्शी तालुक्यातील शेतकरी भयभीत झाले आहेत. नुकत्याच घडलेल्या घटनांमध्ये, चोराखळी (ता. धाराशिव) येथे एका बैलावर झालेल्या हल्ल्यानंतर वनविभागाने त्या परिसरात ट्रॅप कॅमेरे लावले होते. भानसळे (ता. बार्शी) आणि चोराखळी (ता. धाराशिव) परिसरात दोन दिवस वाघाचे सतत हल्ले झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतीसाठी महत्त्वाचे असलेले बैल या हल्ल्यांमध्ये बळी पडत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

# माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा बेपत्ता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचा मुलाग पुण्यातून बेपत्ता झाला आहे. ऋषीराज सावंत हे पुणे विमानतळावरून गायब झाल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान माहिती मिळताच पुणे पोलीस विमानतळावर दाखल झाले असून, तपास सुरू केला आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. दुपारी ड्रायव्हरला विमानतळावर सोडायला लावलं होतं, त्यानंतर त्या ठिकाणाहून ऋषीराज सावंत हे बेपत्ता झाल्याची माहिती समोर येत आहे. याप्रकरणी अपहरणाची तक्रार देखील नोंदवण्यात आली आहे.

शिवसेनेचे आमदार आणि माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषिराज तानाजी सावंत (वय ३५) यांचे पुण्यातून अपहरण करण्यात आले. पुण्यातील सिंहगड रोड पोलीस ठाण्यात या प्रकरणी तक्रार देण्यात आली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सोमवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास नऱ्हे परिसरातून स्विफ्ट गाडीतून त्याचे अपहरण करण्यात आले, अशी माहिती समोर आली आहे. सिंहगड रोड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून अधिक तपास सुरू आहे.

**सोलापूर** : राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देत सरकारने सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांची मुदत 24 दिवसांनी वाढवली आहे. लातूर व बीड जिल्ह्यात सोयाबीन खरेदी केंद्रे बंद झाल्याने हजारो शेतकऱ्यांचे सोयाबीन विक्रीविना राहिले होते. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना हमीभावाने सोयाबीन विक्रीची संधी मिळणार आहे. लातूर व बीडमध्ये आंदोलनानंतर हा निर्णय घेण्यात आला.

### आमदार पाटील व आमदार कांबळे यांची बग्गीतून व घोड्यावरून निघाली मिरवणूक

# माढा-सिनाचे पाणी बावीला आणल्यावरच फेटा बांधणार - आ.अभिजीत पाटील

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**माढा :** माढा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील व पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे व बावीचे सुपुत्र आमदार सुनील कांबळे यांची बग्गीतून व घोड्यावरून मोठ्या उत्साहात ग्रामस्थांनी सत्कार करत मिरवणूक काढण्यात आली.

ग्रामदैवत बालिंगेश्वर व विठ्ठल रुक्मिणी मातेस नतमस्तक होऊन ग्रामस्थांनी मतदानरुपी आशीर्वाद दिल्यामुळे हे परिवर्तन घडले आणि हा विजय मिळाला. निवडणुकीच्या संघर्षात बावीच्या अनेक सहकाऱ्यांनी सर्वांच्या पुढे येऊन सहभाग घेतला. बावीमध्ये बैलगाडा शर्यतीमुळे विजयाचे वातावरण निर्माण झाले. बावीकरांच्या सत्काराने मला दहा हत्तीचे बळ मिळाले. बीवी गावाला सीना-माढा योजनेचे पाणी आणल्यावरच गावात फेटा बांधणार हा संकल्प मी केला आहे आणि तो पूर्ण करण्यासाठी मी कायम कटिबद्ध आहे असे प्रतिपादन माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी केले.

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे व बावीचे सुपुत्र आमदार सुनील कांबळे व माढा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिजीत पाटील यांची बगीतून मिरवणूक काढण्यात आली ग्रामस्थांनी जेसीबी द्वारे फुलाची उधळण करत नागरी सत्कार केला. यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे सदस्य भारत शिंदे, तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, संभाजी ब्रिगेड दिनेश जगदाळे, बालाजी पाटील, जिल्हा युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी, डीएस मोरे महाराज, कुरण गिड्डे, सयाजी पाटील, राजाभाऊ पाटील, अनिल मोरे, लक्ष्मण मोरे, निलेश पाटील, उल्हास मोरे, दयानंद महाडिक देखमुख, पप्पू मोरे, सुरज मोरे, स्वप्नील मोरे, शुभम मोरे, आकाश मोरे, सुदर्शन मोरे, आदर्श मोरे, तेजस मोरे, निखिल मोरे, रामराजे मोरे, नागेश मोरे, केदार मोरे यासह आदी उपस्थित होते.

## 50 हजारांचा ऐवज लंपास




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी 50 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. रामवाडी परिसरातील न्यू धोंडिबा वस्तीतील राजू हणमंतू तलवार यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्याने सोन्याची बोरमाळ, अंगठी, चांदीचे ब्रेसलेट व रोकड असा एकुण 50 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. या प्रकरणी राजू तलवार यांच्या फिर्यादीवरून सलगर वस्ती पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा तपास पोलीस हवालदार उडानशिव करीत आहेत. सध्या सोलापूर शहर व परिसरात चोरीचे प्रमाण वाढले असून नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

» Selected

## ऊसतोड विवाहित महिलेचा विनयभंग

**सोलापूर :** एका ऊसतोड विवाहित महिलेच्या घरी जेवणासाठी आलेल्या टोळीतील मजुराने वाईट नजरेने पाहत, हात धरून ओढत खाली पाडून मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याची घटना घडली. हात धरून ओढला व खाली पाडले, त्यावेळी पीडित महिला आरडाओरडा करू लागल्याने, त्याने तिचे तोंड हाताने दाबून अश्लील कृत्य करू लागला. त्यावेळेस फिर्यादीचा पती दुकानावरून परत आला, तेव्हा आरोपीने फिर्यादीच्या पतीला पाहून धक्का देऊन पळून गेला. घडलेला प्रकार फिर्यादीने तिच्या पतीस सांगितला. पोलिसात आरोपी रामेश्वर चव्हाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## थांब्याची मागणी; अक्कलकोट रेल्वे स्टेशन केवळ नावालाच




**सोलापूर :** अक्कलकोट रेल्वे स्टेशनवरून रोज दिवसभरात डझनभर रेल्वे गाड्या धावतात. त्यामधून थांबा मात्र केवळ बोटावर मोजण्या इतक्याच गाड्यांना आहे. यामुळे अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज, गौडगाव येथील जागृत हनुमान, हैद्रा येथील खाजा बंदेनवाज, जेऊर श्री काशीविश्वेश्वर येथे दर्शनासाठी येणाऱ्या देश-विदेशातील भाविकांना यांचा मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. त्यामुळे अक्कलकोट स्टेशनवर महत्त्वाच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी होत आहे.

# मोहोळ येथे तिहेरी अपघातात एक ठार; पंधराजण जखमी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ** : मिनीबस, कंटेनर, आणि मोटारसायकल अशा तिहेरी अपघातात १ जणाचा मृत्यू तर १५ जण जखमी झाले. हा अपघात कोळेगाव पाटी जवळ रविवारी दि.९ फेबुवारी रोजी दुपारी घडला.या अपघातामुळे लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार अक्कलकोट तुळजापूर दर्शन करून एक मिनीबस क्र. MH-21/KQ1175 दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाली होती. ती कोळेगांव पाटी जवळ आली असता अचानक रस्ता ओलांडणाऱ्या मोटार सायकल क्र - MH13/ CN 335 ला पुणे ते सोलापूर जाणाऱ्या NL-01/ AA7205 या कंटेनर ने धडक दिली. आणि पुन्हा राँग साईडने येऊन मिनी बस ला पण धडक दिली.त्यामुळे बस रस्त्यातच पलटी झाली. त्यामुळे कंटेनर चालक पळून गेला. तर मोटार सायकल चालक दयानंद सदा भोसले (रा.लांबोटी ) हा गंभीर जखमी झाला. त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यापूर्वी मयत घोषित करण्यात आले. तर सई मांढरे, सोनाली आडूळकर, रेखा चौधरी आणि चालक लक्ष्मण पवार यांना उपचारासाठी सोलापूरात दाखल करण्यात आले.

अपघातात जखमींची नावे - प्राची पांडुरंग मांढरे, छाया रतन शेडगे, कोमल अनिल जोरकर, भक्ती पांडुरंग मांढरे (वय १६) बेबी सुधाकर गायकवाड (वय ३२) , कोमल सचिन मांडरे (वय २१), रेश्मा नितीन चौधरी (वय ३५), सोनाली आडुळ कर, सपना रमेश मोहिते (वय ४०), अश्व अरुण खाडे (वय ५), परी आनंद जोरकर (वय ६) अशी आहे.

## शुभेच्छा...!

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अकलूज :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देताना आ. रणजितसिंह मोहिते-पाटील. यावेळी माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत, शिवाजी सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

## विवाहितेचा छळ प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**सोलापूर :** तुला जेवण बनवता येत नाही, तुला मूल होत नाही, तू वांझोटी आहेस असे म्हणून सासरच्यांनी शिवीगाळ करीत मारहाण केल्याची फिर्याद प्रतिभा राजेंद्र शेरखाने यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यावरून पती राजेंद्र शेरखाने, सासू विमल शेरखाने, सासरा सुरेश शेरखाने तिघेही राहणार कोटा नगर सोलापूर व नणंद मनीषा देशमुख उर्फ कांबळे (राहणार सोनिया नगर, विडी घरकुल ) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पोलीस हवालदार कटके करीत आहेत.

# राजकारणाची दशा आणि दिशा बदलली का?



मयत संतोष देशमुख

> कालच भीष्मद्वादशी भाविक भक्तांत साजरी केली गेली. याच भीष्माचार्याला कुरुक्षेत्रावरचे युद्ध संपल्यानंतर राजोपदेश करण्याचे भगवान श्रर्कृष्णांनी भीष्माचार्यांना सांगितले. हा राजयोग सांगताना राज्यकर्त्यांनी (तत्कालीन राजांनी ) राष्ट्रनिष्ठा, समाज निष्ठा अंतःकरणाचा ठाव बनवून स्वार्थांधतेची वृत्ती पायदळी तुडवून समाज कल्याणाचे व्रत स्वीकारण्याचा सल्ला दिला. ५ हजार वर्षापासून ही परंपरा चालत आली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सुद्धा ब्रिटीशांचे साम्राज्य असून सुद्धा याबाबतची दक्षता घेण्यात येत होती. ७५ वर्षाचा कालखंड उलटला आणि हा अमृतयोग राजकारणाला वेगळी दिशा आणि दशा निर्माण करणारा ठरला. हे वास्तव नाकारता येणार नाही.

वरील उदाहरण सांगण्याचे प्रयोजन एवढेच गेल्या दोन महिन्यांपासून मराठवाड्यांतील बीड जिल्ह्यात राजकारणातल्या गावगुंडांनी जो हैदोस माजविला आहे ते वादळ शमण्याचे नाव घेईना. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना जीवंत मारुन दलालांनी एक इतिहास घडविला. हे दलाल राजकारण्यांनी पोसलेल्या बांडगुळांचे हस्तक मानले गेले आणि याचा उद्रेक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात होताना दिसला. सत्ताधारी विरुद्ध जनता, राजकारणी विरुद्ध सर्वसामान्य माणूस आणि यातून निर्माण झालेली जाती-पातीची भावना गेल्या दोन महिन्यांपासून उद्रेक करणारी ठरली. या प्रकरणात मराठवाड्यातील मात्तबर राजकारणी आणि विद्यमान मंत्री मंडळातील एक मंत्री यांचा हस्तक असलेला एक क्रूरकर्मा वाल्मिक कराड नावाचा एक गावगुंड चर्चिला जात आहे. ज्यांनी हे गुंड पोसले त्यांच्यावर सौर उर्जेच्या प्रकरणात खंडणीचा आरोप केला गेला. आणि यातूनच एका निष्पाप गावकऱ्यांचे हित जपणाऱ्या सरपंचाची हत्या झाली.

या प्रकरणात अनेक राजकीय पक्षाच्या नेत्यांनी उड्या घेतल्या. राज्यकर्त्या पक्षाच्या आमदारांनी रणांगणावर येऊन आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या. देशमुख कुटुंबाच्या सदस्यांनी डोळ्यातले अश्रू आटेतोपर्यंत न्यायाची मागणी केली. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या भगिनींनी कागदोपत्री शेकडो पुरावे शासनापुढे सादर केले. समाजासमोर मांडले. किती प्रकारचे घोटाळे आणि मलिदा खाण्याच्या पद्धतीत दृष्टीक्षेप टाकला तर एक राजकारणी आणि त्यांनी पोसलेले हस्तक राजकारणाचे कसे पोतेरे करु शकतात याचे सत्य बाहेर आल्याशिवाय राहात नाही.

एका कंपनीचे ऑफीस इनकम कंपनीचे अध्यक्ष, कार्यकारी मंडळाचे सदस्य कोळशापासून बनलेली राख ते त्या राखेची विल्हेवाट लावण्यांपर्यंतचे घेतलेले ठेके. यातून मिळालेला उदंड पैसा. इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांच्या पीक विम्याच्याबाबत कागदोपत्री पुराव्यानिशी उघड झालेले सत्य व्यापाऱ्यांच्याकडून खंडणी गोळाकरुन त्यांना लुटण्याचा केलेला प्रयत्न या दमदाटीमुळे, लुबाडणूकीमुळे, प्रसार माध्यमांच्या सांगण्यावरुन ५०० व्यापाऱ्यांनी परळी सारखे तिर्थक्षेत्र सोडून अन्यत्र आसरा घेणे शिवाय गावकुसापासून ते शहरापर्यंत दारुची दुकानं थाटणे, पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात कुणाच्यातरी नावावर शेकडो कोटी रुपयाची संपत्ती उभा करणं, अधिकाऱ्यांशी संधान साधून खिशे तुडुंब भरुन टाकणे आणि राजकारणाच्या माध्यमातून जिथे रस्ता सापडतो तिथून स्वार्थाचा नंगानाच घालून आर्थिक संपन्नता प्राप्त करुन घेणे अशा कितीतरी तक्रारी समोर आल्या असताना सुद्धा मंत्रीपदाचा मोह अजूनही सुटू शकत नाही किंवा कुणाकडून तरी तो सोडविला जात नाही हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे दुर्दैव मानावे लागेल. पापाचे ढीग एकीकडे कराचे आणि दुसरीकडे भगवान भोलेनाथांना या संकटातून सोडविण्यासाठी अभिषेक करायचे ही प्रामाणिक भक्ती किंवा श्रद्धा मानली जाईल ?

राजकारणाची दशा आणि दिशा फरफटत चाललेल्या फाटलेल्या पतंगासारखी दिसते. एवढे अघोरी कारणामे समोर आले असताना सुद्धा दोषारोप ठेवून मंत्री मंडळातून त्यांना काढले जात नाही हे महाराष्ट्राच्या राजकारणातलं कितवं आश्चर्य मानायचं ? याबद्दल आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. गेल्या पाच-सात वर्षापासून महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा घाणेरडा प्रकार समोर येताना दिसतो. माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अडीच वर्षाच्या कारकिर्दीनंतर देवेंद्र फडणवीस यांची कारकिर्द सुरु झाली. निवडणूका होऊन महिना दिड महिना झाला तरी मंत्रिमंडळ स्थापन झाले नाही. मंत्रिमंडळ स्थापन झाले तर संपर्क मंत्र्यांच्यावरुन प्रचंड गदारोळ निर्माण झाला. खाते वाटपाच्या संदर्भातही हमरीतुमरी झाली. आजही दोन जिल्ह्याच्या पालकमंत्र्याचा वाद धुमसताना दिसतोय. आघाडीच्या राजकारणात हे वैचारिक व्दंद समोर येतच असते हे शरद पवार यांच्या पुलोद च्या शासनापासून महाराष्ट्र बघत आला आहे. त्याला महायुतीचे सरकार तरी कसे अपवाद ठरु शकते? ज्यांच्या हातात हात घालून राज्य कारभार करायला नको होता त्यांनाच मांडीवर बसवले आणि त्यांच्याच चेल्याचपाट्यांनी महाराष्ट्रात राजकीय स्वार्थाची दुर्गंधी पसरविण्याचा उन्माद मांडला.

यापेक्षा शिंदे यांची शिवसेना आणि भाजपाची रणनीती हातात हात घालून चालत होती. विधानसभेच्या निवडणुकीनंतर ज्या मंत्र्यांच्याकडे दोषारोपाचे बोट दाखविले जात होते त्यांनाही अनाथांचा नाथ असलेल्या एकनाथांनी बाजूला सारले. ही बाब कौतुकाची मानली गेली पाहिजे. मग बीडच्या मंत्री महोदयांच्याबाबत निर्णय का घेतला जाऊ शकत नाही? याचे कोडे संपूर्ण महाराष्ट्राला पडताना दिसते. विधानसभेच्या निवडणूकीत भाजपांनी स्वतःच्या बळाचा आटकेपार झेंडा लावला. हिंदू हृदय सम्राटांचे व आनंद दिघे यांच्या विचाराचे खरे वारसदार असलेले शिंदे-फडणवीस यांनी आपली राजकीय शक्ती पणाला लावून राजकारणाची घडी बसविण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाला.

पण गेल्या दोन महिन्यापासून बीडच्या प्रकरणाचा उठलेला गदारोळ जर लवकर शमला नाही तर मुख्यमंत्र्यांनी जनतेला अपेक्षित असा निर्णय घेतला नाही तर महाराष्ट्राने तुमच्यावर केलेल्या अलोट प्रेमाची किंमत सार्थकी लागेल का? याचा विचार होणे गरजेचे आहे. सरकार टिकले पाहिजे, सरकार जनतेच्या हितासाठी चालले पाहिजे ही भूमिका खऱ्या अर्थाने वटवायची असेल तर मंत्री मंडळातील ही घाण बाजूला करा आणि जनतेच्या विश्वाला पात्र व्हा हीच सामान्यातल्या सामान्य महाराष्ट्रीयन जनतेची अपेक्षा आहे.



- बाळासाहेब बडवे
ज्येष्ठ पत्रकार
मो.नं.7028543453

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मोठ्या विश्वासाने सलग तिसऱ्यांदा सेवा करण्याची संधी दिली आहे. या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करण्यासाठी आणि नागरिकांशी संवाद साधण्यासाठी या मतदार संघाचे भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांनी वीरशैव नगर येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांशी आपुलकीचा संवाद साधत दाखवलेल्या विश्वासाबद्दल नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच, आगामी काळात या परिसरात अधिकाधिक विकासकामे होतील, याची ग्वाही दिली.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले परीक्षार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन

# 'स्वेरी'च्या विद्यार्थ्यांनी घेतला 'परीक्षा पे चर्चा २०२५' लाईव्ह उपक्रमाचा फायदा

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'परीक्षा पे चर्चा २०२५' कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचा लाभ घेताना व स्वेरीच्या इंजिनिअरिंग व फार्मसी मधील पदविका ते पदव्युत्तर पदवी महाविद्यालयातील मधील विद्यार्थी व प्राध्यापक.

**पंढरपूर :** भारताचे उपक्रमशील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करून परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे आवाहन केले. यावेळी स्वेरी अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांतील सर्व वर्गात या लाईव्ह उपक्रमाची व्यवस्था केली होती. याचा इंजिनिअरिंग व फार्मसी मधील पदविकेपासून ते पदव्युत्तर पदवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

केंद्रीय मंत्रालयाच्या 'मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन' यांच्या आदेशाने व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) यांच्या सूचनेनुसार तसेच स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने डिप्लोमा इंजिनिअरिंग, डिग्री इंजिनिअरिंग, डिप्लोमा फार्मसी व डिग्री फार्मसी मधील विद्यार्थ्यांना 'परीक्षा पे चर्चा २०२५' या लाईव्ह उपक्रमाचा आनंद घेता आला. सध्या परीक्षेचे दिवस असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परीक्षेला कसे सामोरे जावे, आपला हेतू काय असावा, परीक्षा देताना आपली मानसिकता कशी असावी? याबाबत सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत एक तास मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थ्यांना व भविष्यात परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या बहुमोल मार्गदर्शनाचा फायदा होणार आहे.

पंतप्रधान मोदी यांनी ओघवत्या शैलीत अभ्यासपूर्ण भाषण केले. यामुळे परीक्षार्थ्यांचे मनोबल वाढले असून ते आत्मविश्वास पूर्वक परीक्षा देण्यासाठी सज्ज झाले आहेत. तासभर केलेल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता भविष्याचा विचार करून शांतपणे वर्तमानकाळात अभ्यास करण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदी यांच्या प्रवाही भाषणानंतर विद्यार्थी अधिक उत्साही झाल्याचे जाणवले. डिग्री फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ डिप्लोमा फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही. मांडवे आणि डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली इंजिनिअरिंग (पदवी व पदविका) व फार्मसी (पदवी व पदविका) महाविद्यालयात या 'परीक्षा पे चर्चा' प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रत्येक वर्गात, तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट हॉलमध्ये या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय करण्यात आली होती.

या थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती यांच्यासह सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, सर्व वर्गशिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बसस्थानकावरून महिलेची दागिन्यांची पर्स चोरली




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापुरातील बसस्थानकावरून गर्दीचा फायदा उचलून महिलेची पर्स चोरून 96 हजार 500 रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना 7 फेब्रुवारीला दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी प्रियांका सुनील कांबळे ( रा. भांडुप, मुंबई ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रियांका या उमरगा बसमध्ये चढत असताना चोरट्याने त्यांची पर्स चोरून नेली. पर्समध्ये 1 तोळ्याचे मंगळसूत्र, 8 ग्रॅमचा नेकलेस, 1 ग्रॅमची कर्णफुले, 1 ग्रॅमच्या काड्या, सोन्याची लहान वाटी व मनी असा ऐवज होता. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

» पान १ वरुन

## नागरी सुविधांसाठी...

देखील नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले. यावर चंद्रकांत पाटील यांनी महापालिकाच्या मर्यादा लक्षात घेऊन आपण यासाठी समांतर यंत्रणा उभे करू अशा आश्वासन दिले. या कर्मचाऱ्यांसाठी लागणारा खर्च आपण स्वतःच्या कंपन्यांच्या सीएसआर निधीमधून देऊन अशी ही गोष्ट यावेळी पाटील यांनी केली.

याचवेळी तातडीने त्यांनी काही कार्यकर्त्यांना निर्देश देऊन समांतर यंत्रणे बाबत चाचणी केली जर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कामे केली नाही तर आपण नेमलेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून ती कामे केली जातील परंतु कोथरूडकारांचे संपूर्ण काळजी घेत त्यांना कचरामुक्त स्वच्छ आणि सुंदर कोथरूड दिले जाईल अशी ग्वाही यावेळी आमदार पाटील यांनी दिली यावेळी स्वप्नशिल्पचे अरविंद लेले , विवेक विप्रदास यांनी त्यांचे स्वागत केले.

## सरगम चौक ते कॉलेज चौक....

इंदिरा गांधी चौकात खड्डे बुजवण्यासाठी माती मिश्रित खडी टाकण्यात आली आहे. यामुळे वाहने रस्त्यावरून जाताना धुळ उडत आहे. याचा त्रास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे . इंदिरा गांधी चौकात रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. हे खड्डे बुजविण्यासाठी माती मिश्रित खडी टाकण्यात आली आहे. या मातीवरून वाहने जात असल्यामुळे रस्त्यावर धूळ उडत असून याचा त्रास रस्त्यावरून जाणारे नागरिक व दुकान चालकांना होत आहे. यामुळे नगरपरिषदेने लक्ष देऊन माती मिश्रित खडी ऐवजी डांबरीकरण करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## नगर परिषदेच्या वतीने शहरातील....

एकादशीच्या रात्रीपासुनच २४ तास स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे काम चालू केले आहे येत्या दोन दिवसात शहरातील सर्व कचरा उचलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याकामी शहरासह ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर, शहर उपनगर आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी ७०० ते ८०० स्वच्छता कर्मचारी काम करत आहेत मात्र बऱ्याच ठिकाणी भाविकांनी उघड्यावर खरकटे अन्न व इतर घाण केल्याने दुर्गंधी पसरू नये म्हणून कचरा उचलण्याचे कामा बरोबरच नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जंतुनाशक पावडर फवारणी व ४ ब्लोअर मशीन ने बायो कल्चर फवारणी हाती घेतली आहे त्यामुळे झालेल्या घाणीचे डीकंपोस्टिंग होऊन दुर्गंधी नष्ट होणार आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ४१ घंटागाडी, आरोग्य विभागाकडील ६ टिपर, ३ कॉम्पॅक्टर, ६ डंपिंग ट्रॉलिने व जेसीबीच्या सहाय्याने ८०० कर्मचाऱ्यामार्फत स्वच्छता करण्यात येत आहे स्थानिक नागरिकांनी व भाविकांनी आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहनही मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी केले असून मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी अँड.सुनिल वाळूजकर आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, आरोग्य निरीक्षक नानासाहेब गोरे सर्व विभाग प्रमुख यात्रा स्वच्छ व सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत.

## विकासासाठी भक्कम प्रयत्न करणार - आ. देशमुख



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांनी नाथ होम्स गृह निर्माण सोसायटी येथे सदिच्छा भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. या भेटीवेळी त्यांनी विधानसभा निवडणुकीत आपल्याला भरभरून मते टाकल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच या परिसराच्या विकासासाठी भक्कम प्रयत्न करणार असल्याचे मत व्यक्त केले. त्याचबरोबर आगामी काळात या भागात अधिकाधिक विकासकामे राबविण्यात येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हुरडा पार्टी...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माढा :** कृषीनिष्ठ, प्रगतशील द्राक्ष बागायतदार श्री.नितीन बापू कापसे यांच्या फार्म हाऊसवर 'हुरडा पार्टी'चे आयोजन करण्यात आले होते. या हुरडा पार्टीस आमदार अभिजीत पाटील हे आपल्या कुटुंबासह उपस्थित होते. याप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

Selected

## आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली ग्वाही



**सोलापूर :** अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच सोलापुरात झाले. या अधिवेशनास शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी उपस्थित राहून सर्व जैन बांधवांना शुभेच्छा दिल्या, तसेच सोलापुरातील जैन बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी नेहमीच समाजासोबत राहणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, दिलीप घेवारे, डॉ. राजेश फडकुले, नितीन नखाते, रमेश रणदिवे, अॅड. साधना संगवे, प्रकर्ष संगवे यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सामान्य पत्रकारांचा मुलगा झाला दाताचा डॉक्टर




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** पत्रकार शिवाजी पालवे यांनी अतिशय हलाखीत मुलाला चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन डॉक्टर बनवण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. पत्रकार शिवाजी पालवे यांचा मुलगा डॉक्टर सावन पालवे यांच्या रूद्रा दाताच्या दवाखान्याच मोठ्या दिमाखात उद्घाटन अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष मदन सिंह मोहिते पाटील, अकलूज शहरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. एम. के.इनामदार यांच्या हस्ते झाले.

यावेळी शहरातील नामवंत डॉक्टर निखिल फडे ,डॉक्टर संतोष खडतरे ,डॉक्टर किरण फडे ,डॉक्टर संजय सिद ,डॉक्टर.ए.बी.आव्हाड , महादेव अंधारे साहेब, संजय गळीतकर डॉक्टर प्रा. मगर श्रीपुर - महाळूंगचे नगर सेवक प्रकाश नवगिरे , त्यांचे सहकारी यांचेसह सर्व पत्रकार बंधु, असंख्य बालमित्र -मैत्रीणी, पत्रकार मित्र, आरोग्य सेवक-सेविका,मित्र, आप्तेष्ट, सगे-सोयरे व नागरिक यानी उपस्थित राहुन शुभेच्छा दिल्या.(यावेळी डॉक्टर पालवे यांनी दाताच्या सर्व समस्या वर अगदी कमीत कमी खर्चात चांगल्या प्रकारे उपचार करणार असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले.

## कारखाली सापडून चिमुकली ठार




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या पार्किंगमध्ये एका सहा वर्षीय मुलीच्या अंगावरून कार गेल्याने जागेवर तिचा मृत्यू झाला. याबाबत उत्तर पोलिस ठाण्यात आरोपी प्रभू किसन आवार (वय ३५, रा. मालेवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेत मुमताज सय्यद (वय ६, रा. कांदा बाजारजवळ, अक्कलकोट) हिचा मृत्यू झाला आहे. समर्थ अन्नक्षेत्र पार्किगजवळील रस्त्यावर पांढरी कार (एमएच ०८ झेड ७४५४) चालकाने वाहन वेगाने आणले. यावेळी फिर्यादीची भाची हाजी मुमताज सय्यद हिला समोरून जोरात धडक दिली.

## भाजपची राष्ट्रीय सक्रिय सदस्यता अभियान आढावा बैठक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राष्ट्रीय सक्रिय सदस्यता अभियान मोठ्या उत्साहात सुरू आहे. सक्रिय सदस्यता अभियान अंतर्गत सोलापूर येथील कन्ना चौक येथे आयोजित बैठकीला उपस्थित राहून सोलापूरचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी सदस्यता नोंदणी अभियानाचा आढावा घेतला व मार्गदर्शन केले. या बैठकीला सोलापूर शहर उपाध्यक्ष जय साळुंखे, प्रविण दर्गोपाटील, भाजपा सरचिटणीस रोहिणी तडवळकर, प्रा. डॉ. नारायण बनसोडे, पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, विजया वडेपल्ली, राजकुमार पाटील, संजय कोळी आदी उपस्थित होते.

## फरारी आरोपीकडून ४ पिस्तूल



**मंगळवेढा :** मंगळवेढा तालुक्यातील जंगलगी गावच्या शिवारात पोलिसांनी-तिघा संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चार देशी बनावटीचे पिस्तूल आणि २३ जिवंत काडतुसे जप्त केली. यातील एक संशयित आरोपी रत्नागिरी जिल्ह्यातील राहणारा असून एका खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना पॅरोल रजेवर कारागृहातून सुटल्यानंतर तो पुन्हा शिक्षा भोगण्यासाठी परत न जाता फरारी होता.




## अखिल भारतीय दिगंबर जैन सैतवाल संघटनेचे

# सोलापुरात राष्ट्रीय अधिवेशन -2025 संपन्न; अनेक मान्यवरांची उपस्थिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** दिनांक 8 फेब्रुवारी आणि 9 फेब्रुवारी रोजी सोलापूर हिराचंद नेमीचंद भवन या ठिकाणी अखिल भारतीय दिगंबर जैन सेतवाल संघटना यांच्या वतीने राष्ट्रीय अधिवेशन घेण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप जी घेवारे महामंत्री नितीन नखाते सोलापूर राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉक्टर राजेश फडकुले यांच्या आणि संपूर्ण टीमच्या संयोजकांनी आणि आयोजकांनी हे दोन दिवसाचे राष्ट्रीय अधिवेशन आठ सत्र मध्ये घेण्यात आले.

त्याप्रसंगी प्रज्ञावंतांचा मेळावा समाजातील इतर बाबींवर लक्ष वेधण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. समाजातील वैविध्यपूर्ण कार्य करणाऱ्या 75 वर्ष वरील ज्येष्ठ नागरिकांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास माननीय सोलापूरचे आमदार कोठे उपस्थित होते.

तसेच महाराष्ट्र जैन समाज आचल समितीचे अध्यक्ष मेहिरजी गांधी यांनी कार्यक्रमास हजेरी लावली. त्याप्रसंगी पंढरपूर तालुका सकल जैन समाज सैतवाल संघटना सह स्वागत अध्यक्ष श्री बाहुबलीजी पूर्वत यांच्या वतीने दिलीपजी घेवारे यांचा सत्कार करण्यात आला. महामंत्री मिलिंद जी नखाते यांचा सत्कार श्री शितल खडके यांच्यातर्फे करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व समाज बांधवांनी प्रयत्न केले. कार्यमाची सांगता मान्यवरांच्या सत्काराने करण्यात आली.

संपादकीय विशेष

# भारतीय एआय मॉडेलच्या निमित्ताने

एआय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता हा घटक सर्वसामान्यांच्या आयुष्याशी वेगाने जोडला जात आहे. तो त्यांची अनेक कामे सोपी, सुलभ करत असल्याने याची उपयुक्तता आणि आवश्यकता सर्वसामान्यांना समजली आहे. दुसरीकडे, याविषयीची भीतीही बघायला मिळते. अनेकांचे रोजगार जातील का, हा प्रश्नही वारंवार विचारला जातो. मात्र या भीतीपोटी आता चॅटजीपीटीचा वापर थांबणे शक्य नाही. याद्वारे आपल्याला अत्यंत समर्पक उत्तरे मिळतात. केवळ माहितीच नव्हे तर जोडीला व्हिडिओ, ऑडिओ, प्रतिमा हे सगळेही मिळते. चॅटजीपीटीच्या या तंत्रज्ञानामागे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) नामक तंत्रज्ञान वापरले जाते. यातील तांत्रिकतेकडे न बघता अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर गुगलचे सर्च इंजिन आणि चॅटजीपीटी यातील फरक लक्षात घेता समजते की सर्च इंजिनवर आपण आवश्यक ती माहिती पुरवण्याची मागणी नमूद करतो आणि त्यानुसार ते संबंधित माहिती पुरवते. मात्र चॅटजीपीटी वापरत असणाऱ्या एलएलएम कडून मिळालेल्या माहितीचे स्वरुप शब्दांमधील मजकुराचे नसते तर माणसाची नैसर्गिक भाषा अर्थात नॅचरल लँग्वेज प्रोसेस समजून घेण्याची क्षमता या अत्याधुनिक तंत्रज्ञानात असते. एलएलएमला हे महत्त्व असल्यामुळे तंत्रज्ञानातील नवीन टप्पा अर्थात जनरेटिव्ह एआय असे म्हणतात. नवनिर्मिती करण्याची क्षमता त्याला वेगळे महत्त्व देऊन जाते.

या क्षेत्रावर अमेरिकेचे मक्तेदार असल्याचे चित्रही स्पष्ट झाले. ते खरेही होते. या तंत्रज्ञानासाठी माहितीचे मोठमोठे ढीग उपसावे लागतात. त्यासाठी संगणकाची प्रचंड मोठी क्षमता वापरावी लागते. सर्वसामान्यपणे संगणकाचे काम चालवण्यासाठी सेंट्रल प्रोसेसिंग युनिटचा वापर होतो. तो संगणकाचा मेंदू असतो. मात्र एआयमध्ये हा मेंदू पुरेसा ठरत नाही. म्हणूनच त्यासाठी विशिष्ट प्रकारची चीप वापरली जाते. त्याला ग्राफिकल प्रोसेसिंग युनिट (जीपीयू) असे म्हणतात. हे जीपीयू तयार करणारी अमेरिकेतील 'एनव्हिडिया' ही कंपनी असून तिची या कामात मक्तेदारी आहे. या चीपच्या बळावर सगळी कामे वेगाने केली जातात आणि म्हणूनच हे काम फक्त अमेरिकेतच होऊ शकते, असे समजले जात होते.

एआयमधील आपली एकाधिकारशाही टिकवण्यासाठी काही दिवसांपूर्वी अमेरिकेने या चीप्सच्या निर्मितीवर मर्यादा घातल्या होत्या आणि चीनला चीप्सची आयात करता येऊ नये, अशा प्रकारचे नियमही आणले होते. मात्र हे सगळे अडथळे पार करुन त्यांच्या 'डिपसीक' या कंपनीने एका वर्षाच्या आत ओपनएआय, जेमिनी, लामा या सगळ्यांसारखे एलएलएम अत्यल्प खर्चामध्ये उभे करुन दाखवले. त्याची क्षमता ओपनएआय वा वर उल्लेख केलेल्या कंपन्यांसारखीच आहे. त्यामुळेच चीनकडून पुढे आणल्या गेलेल्या या तंत्रज्ञानाने जगाला मोठा धक्का बसला. याचे जागतिक परिणामही बघायला मिळाले. अगदी सर्वसामान्य लोकही याचा विनामूल्य वापर करु शकणार असल्याने स्पर्धेला तोंड फुटल्याची भीती व्यक्त केली गेली. आता डिपसीक कंपनीचे बाजारात आलेले एलएलएम ओपन सोर्स असणे हादेखील एक मोठा आणि महत्त्वाचा घटक समजला गेला. त्यामुळेच चॅटजीपीटी वा जेमिनी या कंपन्यांना सॉफ्टवेअरमधून मिळणाऱ्या निधीला धोका पोहोचण्याची भीती वाढली आणि जागतिक पातळीवर त्याचे आर्थिक पडसाद बघायला मिळाले.

या सगळ्या पार्श्वभूमीवर सध्याच्या चर्चेप्रमाणे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) ची निर्मिती भारत नव्याने करणार आहे की त्यासाठी सध्या उपलब्ध असणारे तंत्रज्ञानच वापरणार, याची स्पष्टता अद्याप आलेली नाही. आहे ते तंत्रज्ञान वापरुन भारत या क्षेत्रात उतरणार असेल तर हे इतके मोठे काम वा महत्त्वपूर्ण बाब वाटणार नाही. मात्र भारत नव्याने हे तंत्रज्ञान विकसित करणार असेल आणि भारताशी संबंधित असणाऱ्या गोष्टींसाठी त्याचा उपयोग होणार असेल तर निश्चितच त्याला खूप जास्त महत्त्व आहे. याद्वारे भारताशी संबंधित अचूक माहिती मिळेल. जागतिक पातळीवरील लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रकारचे तपशील तितक्याशा मोठ्या प्रमाणात येत नाहीत. भारत आपल्यासाठी एआय च्या तंत्रज्ञानाची निर्मिती करेल तेव्हा भारताशी संबंधित सर्व छोटे-मोठे तपशील येऊ शकतील. अर्थातच ते स्थानिक व्यापार-उदिमासाठी अत्यंत उपयुक्त ठरु शकतात. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर भारतातील कला, संस्कृती, इतिहास अशा बाबींची माहिती तिथे असेल तर सर्व प्रकारचे व्यवसाय, धंदे त्या अनुषंगाने आपला व्यवसाय पुढे नेऊ शकतात. त्या दृष्टीने सॉफ्टवेअर निर्माण करणे वा अशी कामे ते करु शकतात.

भारतीय भाषांचे महत्त्व हादेखील यातील महत्त्वपूर्ण भाग म्हणता येईल. आताही चॅटजीपीटीला हिंदी, मराठी आदी भाषा कळतात आणि तो या भाषांमध्ये संवाद साधतो. बऱ्यापैकी चांगल्या मराठीत त्याच्याकडून उत्तरेही मिळतात. मात्र आपल्याकडे ही यंत्रणा वा तयार होणाऱ्या तंत्रज्ञानाची क्षमता अर्थातच यापेक्षा कित्येक पट चांगली असेल. भारतासाठीच हा प्रकल्प उभा राहणार असेल तर अधिक विस्ताराने होईल. त्यामध्ये अधिक सखोल विचार केला जाईल. अशा अर्थाने भारतीय भाषांसाठी येऊ घातलेला हा बदल खूप महत्त्वाचा ठरु शकेल.

लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये माहितीचे साठे खूप मोठ्या प्रमाणावर असतात. पण याच्या जोडीला भारतात स्मॉल लँग्वेज मॉडेल्सही तयार होऊ शकतात. ती त्या त्या व्यवसायासाठी, राज्यासाठी वा अगदी गावासाठीही कामी येऊ शकतात, कारण विविध पातळ्यांवर बनवता येऊ शकतात. याला आपण फोकस लँग्वेज मॉडेलही म्हणू शकतो. पण त्याचबरोबर इथे केवळ फोकस माहितीच नव्हे तर, अन्य प्रकारेही कृत्रीम बुद्धिमत्ता मदत करु शकते. जसे की, हे तंत्रज्ञान विशेष मुलांसाठी कशा प्रकारची चित्रे आणि व्हिडिओ असू शकतात, हे बघून त्यानुसार संशोधन समोर मांडेल. थोडक्यात, अशा प्रकारचे अनेक प्रयोग करण्यास मोठा वाव आहे. स्थानिक पातळीपासून देशाच्या पातळीपर्यंत ते राबवता येऊ शकतात. पण त्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. आवश्यक तेवढा निधी आला पाहिजे. विशेष म्हणजे अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठी याचा वापर करुन घेता येतो, यासंबंधीची जाण लोकांमध्ये आली पाहिजे. अशा अंगांनी वापरल्यास हे तंत्रज्ञान लक्षणीय बदल घडवून आणू शकेल. एकदा हे साधले की जागतिक पातळीवरील व्यापारवृद्धीच्या संधी खुल्या होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

# रुपयाची घसरण थांबवायची तर...

**अमेरिकी डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया गेल्या पाच वर्षांमध्ये सुमारे वीस टक्क्यांनी घसरला आहे. अमेरिकी डॉलरची अधिकाधिक मजबुती हेच रुपयाच्या घसरणीमागील महत्वाचे कारण आहे. रुपयाला सावरण्यासाठी कोणताही हस्तक्षेप केल्यास देशाच्या निर्यातक्षेत्राला हानी पोहोचण्याची शक्यता आहे. सध्या रिझर्व्ह बँकेने रोजगारनिर्मिती आणि देशांतर्गत मागणी वाढवण्यावर लक्ष्य केंद्रित करण्याचे आवाहन डॉ. राजन यांनी केले आहे.**

परामर्ष

हेमंत देसाई

ज्येष्ठ पत्रकार



भारतीय रुपया हा अमेरिकी डॉलरच्या तुलनेत मागच्या दोन वर्षांमध्ये पाच टक्क्यांनी उतरला आहे. गेल्या पाच वर्षांचा विचार केला, तर ही घसरण वीस टक्क्यांची आहे. केंद्रात डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृवाखालील सरकार असताना भारतीय रुपयाची घसरगुंडी झाल्याबरोबर देशाची प्रतिमा जगात मलिन होत असल्याची टीका तेव्हा विरोधी बाकांवर असलेले नेते करत होते. आता तीच मंडळी सत्तेवर आल्यावर या घसरगुंडीचा वेग उलट वाढला आहे.या पार्श्वभूमीवर, दक्षिण आणि आग्नेय आशियातील सर्वात वाईट कामगिरी ही रुपयाची आहे, अशी टीका 'मूडीज' या आंतरराष्ट्रीय पतमापन संस्थेने केली आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाने 86 रुपयांची मर्यादा ओलांडली आहे. मात्र भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, हिंदुस्तान पेट्रोलियम, इंडियन ऑइल, अल्ट्राटेक सिमेंट, भारती एअरटेल आणि एएनआय टेक्नॉलॉजी यासारख्या कंपन्यांकडे डॉलरच्या तेजीवर मात करण्याची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित असून त्यानुसार उपाययोजना केल्या जात असल्याचे निरीक्षण 'मूडीज'ने नोंदवले आहे. परंतु इतर कंपन्यांचे काय?

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विस्ताराचा वेग जगात सर्वाधिक आहे. अमेरिकेच्या वाढीचा वेग 2.7 टक्के असून चीनच्या वाढीचा वेग 4.9 टक्के आहे. परंतु अमेरिका आणि चीनचा विकास भारतापेक्षा कैकपट जास्त आहे. भारताची अर्थगती सहा-सात टक्क्यांच्या दरम्यान मागे-पुढे होत असते. भारतात मध्यमवर्ग आणि गोरगरिबांच्या मागणीत अनुक्रमे 30 टक्के आणि 6.9 टक्के घट झाली आहे. याचा अर्थ भाववाढ झाल्यामुळे त्यांच्या खिशात वेगवेगळ्या वस्तू विकत घेण्यासाठी पैसाच शिल्लक राहिलेला नाही. अन्नधान्य महागाई सहा टक्क्यांपेक्षा जास्त आहे. जनतेचा औषधे, वैद्यकीय सेवा यावरील वार्षिक खर्च सरासरी फक्त 14 टक्के वाढला आहे. शिक्षणक्षेत्रातील महागाई 11 टक्के आहे. त्यामुळे लोकांनी जगायचे तरी कसेअसा प्रश्न उपस्थित होत आहे.

अमेरिकी डॉलरची अधिकाधिक मजबुती हेच रुपयाच्या घसरणीचे एकमेव कारण असल्याचे मत अलीकडेच रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी व्यक्त केले आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाला सावरण्यासाठी कोणताही हस्तक्षेप केल्यास, देशाच्या निर्यातक्षेत्राला हानी पोहोचण्याची शक्यता आहे. सध्या रिझर्व्ह बँकेने केवळ रोजगारनिर्मिती आणि देशांतर्गत मागणी वाढवण्यावर लक्ष्य केंद्रित करण्याचे आवाहन डॉ. राजन यांनी केले आहे. त्यांच्या या मताची दखल केंद्र सरकारने अवश्य घेतली पाहिजे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विदेशी मालावरील व्यापार शुल्कात वाढ केली आहे. त्यामुळे इतर चलनांच्या तुलनेत डॉलरचे मूल्य वाढत आहे. आयात शुल्क वाढवल्याने अमेरिकेची आयात घटेल. त्यामुळे अमेरिकेची चालू खात्यावरील तूट कमी होईल. अमेरिकेचा आयात खर्च घटल्यास अर्थातच डॉलर मजबूत होईल. याच कारणाने उर्वरित जगात डॉलरची चणचण निर्माण होईल. तसे घडल्यास अमेरिका हे जगातील गुंतवणुकीचे सर्वाधिक आकर्षक केंद्र ठरेल. अशा वेळी अमेरिकेतून भारतात आलेले भांडवल मोठ्या प्रमाणात पुन्हा माघारी फिरेल. गेल्या दोन-तीन महिन्यांमध्ये आपण याचा प्रत्यय घेतला आहेच.

रिझर्व्ह बँकेने डॉलरच्या तुलनेत रुपयाला सावरण्याचा प्रयत्न करणे इतर सर्व चलनांच्या तुलनेत रुपयाला मजबूत करणारे ठरेल. त्यामुळे आपल्या निर्यातदारांसाठी ते हानिकारक होईल, हे लक्षात घ्यायला हवे. रुपयाला आधार देण्यापेक्षा खरी गरज आहे, ती भारताच्या घसरलेल्या विकासदराची काळजी करण्याची. चलन बाजारातील रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपामागे नेहमीच अस्थिरता कमी करणे आणि रुपयाची अंतिम पातळी बदलण्याचा प्रयत्न न करणे, असा दुहेरी हेतू राहिला आहे. सुदैवाने सद्यस्थितीत रिझर्व्ह बँकेने फारसा हस्तक्षेप केलेला नाही, हे नोंदवले पाहिजे. भारताने मात्र निर्यात वाढवण्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. मध्यंतरी बांगलादेशमधील शेख हसीना राजवट कोसळली. कापड उद्योगात बांगलादेश आघाडीवर आहे. परंतु वस्त्रोद्योगाला देशांतर्गत अस्थिरतेचा फटका बसला. अशा वेळी भारताने या परिस्थितीचा लाभ उठवण्याची गरज होती. पण तसे घडून आले नाही. ट्रम्प हे चीनविरोधी धोरणे राबतील, अशी शक्यता आहे. त्यांनी शुल्कांमध्ये वाढ करुन तसे दाखवून दिलेही आहे. अशा वेळी भारताने चीनला पर्याय बनण्याच्या दृष्टीने निवडक वस्तूंच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित करायला हवे. चालू आर्थिक वर्षात भारतातून केली जाणारी एकूण माल आणि सेवांची निर्यात 814 अब्ज अमेरिकी डॉलरएवढी असेल, असा होरा आहे. याचा अर्थ निर्यातवाढ सुमारे साडेपाच टक्क्यांनी होईल. वाढीचा हा वेग आनंदून जावे, असा नाही. गुणवत्ता, किंमत, पुरवठ्याचा वेग या तिन्ही बाबतीत भारताने सुधारणा घडवली पाहिजे. निर्याताभिमुख विकास हीच प्रगतीची गुरुकिल्ली ठरेल.

भारताची आर्थिक वाढ आगामी काळात बाह्य घटकांपेक्षा देशांतर्गत घटकांवर अधिक अवलंबून असेल. जगभरातील व्यापाराचा वेग आता ठप्प झाला आहे. त्यामुळे भारताला आपल्या परकीय व्यापार धोरणात बदल करावे लागतील. युरोपसमोर अनेक राजकीय आणि आर्थिक आव्हाने आहेत. युरोपमधील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या जर्मनीला सलग दोन वर्षे मंदीचा सामना करावा लागत आहे. या वर्षी तेथे होणाऱ्या निवडणुकांमुळे राजकीय अस्थिरता आणखी वाढली आहे. फ्रान्समध्येही नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर राजकीय गोंधळ उडाला आहे. ब्रिटनमध्ये नवे सरकार आले आहे; पण मजूर पक्ष आर्थिक आव्हाने आणि आर्थिक मंदीचा सामना करत आहे. एकूणच, युरोपवर आपली स्पर्धात्मकता कायम ठेवण्याचा दबाव आहे. अक्षय ऊर्जेकडे वाटचाल केल्यामुळे ऊर्जेचा वाढता खर्च हा दबाव आणखी वाढवत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेवर या समस्यांचा परिणाम झाला आहे. 'फेडरल रिझर्व्ह बँक ऑफ डॅलस'च्या 'ग्लोबल इकॉनॉमिक ॲक्टिव्हीटी इंडेक्स'मध्ये हे स्पष्टपणे दिसून येते. कोरोनानंतर चीनची अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आली असली, तरी अपेक्षित गती आली नाही. त्याऐवजी, रिअल इस्टेट क्षेत्रातील अतिउत्पादन आणि आर्थिक दबाव यासारख्या समस्या अधिक गडद झाल्या आहेत. कमकुवत मागणीमुळे अर्थव्यवस्थेत मंदी दिसून येत आहे. देशांतर्गत वापर वाढवण्यासाठी कोणतीही ठोस धोरणात्मक पावले उचलली गेली नाहीत. या कारणास्तव, जादा उत्पादन बाह्य बाजारपेठेत पाठवले जात आहे. त्यामुळे चीनी निर्यात चांगली कामगिरी करत आहे.

अलीकडे अमेरिकन डॉलरचे मूल्य वाढले आहे. 'फेडरल रिझर्व्ह'ने आपल्या धोरण व्याजदर अंदाजात केलेल्या बदलामुळे उदयोन्मुख बाजार चलनांचे मूल्य घसरले आहे. ही घट राजकोषीय दबाव आणि ऐतिहासिकदृष्ट्या कमी वास्तविक व्याज दरांमुळे आहे. यामुळे काही चलनांचे मूल्य इतर चलनांच्या तुलनेत वेगाने घसरले आहे. युरोप आणि चीनमधील आर्थिक संकट तसेच बांगलादेशमधील आर्थिक स्थितीचा विचार करून भारताने निर्यातवाढीची धोरणे आखायला हवीत. साखर, कांदा, द्राक्षांसह अन्य वस्तूंच्या निर्यातीचे निर्णय वेळच्या वेळी घेणे आवश्यक आहे. जगभरातील अनेक शेअर बाजार सध्या उच्च पातळीवर आहेत. आर्थिक वाढ आणि कमाईबाबत अनिश्चितता असूनही, गुंतवणूकदार बेफिकीर दिसत आहेत. सिक्युरिटायझेशन, लीव्हरेज्ड लोन आणि खासगी क्रेडिटबद्दल वाढती चिंता असूनही, गुंतवणूकदारांना आर्थिक स्थिरतेच्या जोखमींबद्दल चिंता वाटत नाही. या जागतिक परिस्थितीत भारत आपल्या विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे; पण अनिश्चित जागतिक व्यापारवृद्धी म्हणजे भारतासाठी निर्यातवाढीची खात्री नाही. भारताची निर्यातवाढ जागतिक निर्यातवाढीवर अवलंबून आहे.

अशा परिस्थितीत येत्या काही वर्षांमध्ये बाह्य घटकांपेक्षा देशांतर्गत विकासाचे घटक तुलनेने अधिक महत्त्वाचे असतील. वाढत्या संरक्षणवादामुळे जागतिक व्यापार परिस्थिती बदलत असल्याने अनिश्चितता वाढत आहे. अशा परिस्थितीत भारताला निर्यात स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी खर्च कमी करून आणि सुविधांमध्ये सुधारणा करून व्यापार स्पर्धात्मकता वाढवावी लागेल. अलिकडच्या वर्षांमध्ये जागतिक व्यापार परिस्थितीत लक्षणीय बदल झाला आहे. जागतिकीकरणापासून दूर गेल्याने व्यापार संरक्षणवाद वाढत आहे आणि अनिश्चितताही वाढली आहे. हे पाहता भारतासाठी नव्या धोरणात्मक 'ब्ल्यू प्रिंट'ची गरज आहे. व्यापार स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी अजून बरेच काही करायचे आहे. चांगली बातमी अशी आहे की असे करणे पूर्णपणे आपल्या अधिकारात आहे. त्यासाठी उद्योगांना निश्चितच गुणवत्तेमध्ये गुंतवणूक सुरू ठेवावी लागेल. प्रतिकूल भौगोलिक राजकीय परिस्थिती असूनही भारताची परकीय व्यापार कामगिरी चांगली आहे, हे मात्र नक्की.

मॅच मेकिंग

## मनावरचा ताण हलका कर



मी २८ वर्षांची मुलगी आहे. एका मॅट्रिमोनियल साईटवरून एका मुलाशी ओळख झाली. आमचे सूर जुळले. या मुलासोबत आयुष्य काढता येईल असा विचार करतानाच माझी मानसिक स्थिती बिघडली. तो काळ माझ्यासाठी अत्यंत वाईट होता. दरम्यान, मी मॅट्रिमोनियल साईटवर भेटलेल्या मुलाशीही भांडले. मात्र त्यानंतर त्याच्याशी पुन्हा संपर्क करण्याचा प्रयत्न केला. पण यश आलं नाही. या घटनेला दोन वर्षं उलटून गेली. पण मनातली सल गेलेली नाही. या मुलाला भेटून माफी मागावी का? आई-वडिलांना माझं लग्न लावून द्यायचं आहे. त्यांनी माझ्यासाठी मुलगही शोधला आहे. पण या मुलाशी माझे सूर जुळलेले नाहीत. त्यामुळे आधीच्या मुलाला भेटावं असं वाटतं. मी काय करू?

**उत्तर** : नव्या नात्यात रस नसेल तर त्या मुलाला तसं स्पष्टपणे सांग. या मुलाला आशेवर ठेवायचं आणि दुसऱ्या मुलाची भेट घ्यायची हे योग्य नाही. आपण आयुष्य एकत्र घालवू शकणार नाही, हे तू स्पष्ट कर. यामुळे तुझ्या मनावरचा ताण हलका होईल. तुम्ही दोघंही नव्या जोडीदाराचा शोध घेऊ शकाल. आधीच्या मलाला भेटायचयं. त्याची जरूर माफी माग. त्यावेळची परिस्थिती समजावून सांग. तुला चुकीची जाणीव झाली. त्यामुळे एकदा प्रयत्न करून बघायला हरकत नाही. मात्र, माफी मागताना कोणत्याही अपेक्षा ठेऊ नकोस.

खेचाखेची

## टार्गेट...


एकदा यमराज १०० लोकांना घेऊन यमलोकात चाललेले असतात. जाताना वाटेत नारदमुनी भेटतात. त्यांना ते दृश्य पाहून आश्चर्य वाटतं. ते यमराजाला विचारतात.

**नारदमुनी** : हे काय यमराज, एकावेळी १०० लोकांना एकसाथ घेऊन चालला आहात. आज कामाचा भलताच ताण दिसतोय.

**यमराज** : काय करणार मुनीवर, मार्च एंडिंग आहे ना... टार्गेट पूर्ण करायचं आहे.

वेगळे काही

सनी देओल हा त्याच्या अडीच किलो वजनाच्या हातामुळे ओळखला जातो. पण, एका महिलेने हातांच्या बाबतीत सनीलाही मागं टाकलं! ही महिला थायलंडमध्ये राहणारी असून तिचं नाव दुवांगजे समकसमम असं आहे. तिच्या हातांचं वजन २० किलो इतकं आहे. ५९ वर्षांची ही महिला एक दुकान चालवते. तिचे हात खूप मोठे आणि जाड आहेत. हातांचं वजन २० किलो असल्यामुळे या महिलेला अनेक अडचणी येतात. या महिलेला मॅक्रोडिस्ट्रोफिया लिपोमॅसटोसा नावाचा आजार आहे. हा दुर्लभ आजार असून त्यामध्ये हातांमध्ये अत्याधिक चरबी जमा होते.



सुप्रभात

राशीभविष्य

- **मेष** : अनुकूलतेमुळे कायात यश लाभेल. कलाकारांचा चांगला वाव मिळेल. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील.
- **वृषभ** : कामात मनाजोगी प्रगती होईल. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. आर्थिक व्यवहारात लाभ होईल.
- **मिथुन** : महत्त्वाची खरेदी होईल. खर्चाचं प्रमाण वाढलं तरी प्राप्तीही तशीच राहील. समाधान लाभेल.
- **कर्क** : चैनीच्या बाबींवर अधिक खर्च होईल. प्रेम प्रकरणात मतभेद संभवतात. पुरेसा संयम बाळगावा.
- **सिंह** : कामानिमित्त प्रवास घडेल. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **कन्या** : अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील. बाकी चिंता नसावी.
- **तूळ** : सुवार्ता कानी येईल. स्थावर प्रश्नात समाधान लाभेल. शिक्षण, क्रीडा या क्षेत्रात प्रयत्न करावे.
- **वृश्चिक** : अनपेक्षित घटना चिंता उत्पन्न करतील. व्यवसायात अड्चणी येतील. व्यवहार विचारपूर्वक करावे.
- **धनु** : हाती घेतलेली काम मार्गी लागतील. सरकारी योजनांचा लाभ घ्यावा. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **मकर** : काम वाढत राहील. व्यवसायात सहकाऱ्यांशी जमवून घ्या. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल.
- **कुंभ** : ग्रहमानाची अनुकूलता समाधान देणारी ठरेल. प्रश्न मार्गी लागतील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **मीन** : आपापल्या क्षेत्रात प्रभाव राहील. प्रेम प्रकरणात एकमेकांना समजून घ्यावं. बाकी चिंता करू नये

सल्ला मोलाचा

## गेट अ कॉर्पोरेट लूक

कॉर्पोरेट जगात काम करताना महिलांना आपला लूक नेहमीच सांभाळावा लागतो. त्यामुळे ड्रेसिंग सेंसला फारच महत्त्व आलंय. कॉर्पोरेट लूक कॅरी करताना कपड्यांसोबत ज्वेलरीकडेही लक्ष द्यायला हवं. ✻ कानातलं निवडताना सर्वात आधी तुमच्या चेहऱ्याच्या आकाराकडे लक्ष द्या. एका कानातल्यामुळे तुमचा लूक एकदम बदलू शकतो किंवा लूकचा विचका होऊ शकतो. ✻ मिटींगच्या वेळी लोंबते, चकमकीत कानातले घालायचे टाळा. स्टड किंवा छोटेसे कानातले अशा प्रसंगी शोभून दिसतील. ✻ तुमचं घड्याळ, गळ्यातलं, ब्रेसलेट, बांगड्या, अंगठी अशी कोणतीही ज्वेलरी तुम्ही घातली असली तरीही त्यावर शोभून दिसेल असंच कानातलं निवडा. ✻ गोल्डन किंवा सिल्व्हर हे दोन रंग कॉर्पोरेट लूकसाठी अगदीच परफेक्ट मानले जातात. पण यासोबतच तुम्ही इतर काही रंगही ट्राय करू शकता. पण कानातल्याचे रंग जास्त भडक नको. ✻ कॉर्पोरेट ऑफिसला सूट होतील अशी काही कानातली तुमच्या ठेवणीत असू द्या. यामुळे प्रसंग किंवा कपडे कोणतेही असले तरीही तुमची पंचाईत होणार नाही आणि कानातले आणण्यासाठी धावाधाव करावी लागणार नाही.

दिनविशेष

## ११ फेब्रुवारी

- **१९६८** : प्रखर राष्ट्रवादाचे साहित्यिक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा मृत्यू.
- **१९९०** : २७ वर्षानंतर नेल्सन मंडेलांची तुरुंगातून सुटका.
- **१९९३** : चित्रपट निर्माते दिग्दर्शक, पटकथाकार कमाल अमरोही यांचं निधन.
- **२०१३** : पोप बेनेडिक्ट (सोळावे) यांचा राजीनामा.
- **२०१४** : अल्जेरियाचे लष्करी विमान कोसळून १०३ जण ठार झाल्याची बातमी.
- **२०१८** : रशियात प्रवासी विमान कोसळून ७१ ठार.

महत्त्वपूर्ण काही...

## ...असं हे सिम्युलेटर

व्हिडिओ चित्रणाचा वापर करून तयार केलेलं मशीन म्हणजे सिम्युलेटर. विमानाची केबिन, रणगाड्यांची केबिन, पाणबुडीची नियंत्रक केबिन यातून दिसणारी दृश्यं, तेथील यंत्रणेचा वापर, ध्वनी या सर्वांचा मेळ या सिम्युलेटरवर घातलेला असतो. डोळ्यांसमोर दिसणारं दृश्य आणि त्यानुसार यंत्रणेचा केलेला, चालकाची परीक्षा पाहणारा वापर, त्यानुसार बदलत जाणारी व्हिडिओ दृश्यं असं हे स्वरूप असतं. शत्रूच्या विमानाचा पाठलाग आणि कृती किंवा वादळात हेलकावणारे विमान तसंच चालकाचा ताबा असा मेळ या यंत्रणेद्वारे बंद केबिनमध्ये घातला जातो. जणू काही हे प्रत्यक्ष विमान उडत आहे. समोर पडद्याऐवजी प्रत्यक्ष दृश्यच दिसत आहे. या सिम्युलेटरसाठी व्हिडिओ चित्रण, कॉम्प्युटरसाठी अत्यंत प्रगत यंत्रणा (सॉफ्टवेअर) लागते. हिची किंमत जवळपास एखाद्या विमानाएवढी वा रणगाड्याएवढीच पडते. पण ते चालवण्याचा खर्च व शिकवण्यात जाणारा तासनतासचा आकाशातील वेळ कायमचा वाचतो. आज नवीन वैमानिकांना अशा यंत्राद्वारेच प्रशिक्षण मिळतं. व्हिडिओचा खरा वापर जगभर महत्त्वाच्या कारणांसाठीच केला जातो, हेही लक्षात ठेवणं आवश्यक आहे.

पंचांग

**मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. १४, नक्षत्र : पुष्य
चंद्रराशी : कर्क, आयुष्मान योग,
सूर्योदय : ७.०९, सूर्यास्त : ६.३६

फॉरवर्डस

प्रेम सर्वांनाच आपल्या कह्यात घेतं. त्यात जात-पात, वय, धर्म कशाचंही बंधन रहात नाही...

**इश्क के पहलू में कभी बैठ कर देखना, दायरा उम्र का न कम हुआ फिर कहना...**

आरोग्यमंत्र

## जाणा हृदयविकाराविषयी...

आजकाल वाढते ताण-तणाव, खाण्या-पिण्याच्या बदलत्या सवयी या तसंच अन्य काही कारणांमुळे हृदयविकाराचं प्रमाण वाढू लागलं आहे. ऐन तारूण्यातही हृदयविकाराचा धोका वाढत असल्याचं दिसून येतं. त्यादृष्टीने काही महत्त्वाची माहिती साऱ्यांनीच जाणून घेणं महत्त्वाचं ठरणार आहे.



✻ इलेक्ट्रोकार्डिओग्राम (इसीजी) ही वेदनारहित, अत्यंत साधी अशी तपासणी आहे. या चाचणीद्वारे हृदयाची गती मोजली जाते. हृदयगती नियमित आहे की अनियमित हे जाणून घेतलं जातं. यामुळे हृदयविकाराच्या झटक्याचा इतिहास जाणून घेता येतो. तसंच रूग्णाला हृदयविकाराचा झटका आला का हे सुद्धा यावरून कळतं.

✻ छातीच्या क्ष-किरण चाचणीद्वारे आतल्या भागाची प्रतिमा मिळते. यात हृदय, फुफ्फुस आणि रक्तवाहिन्या यांच्या प्रतिमा मिळतात. हृदयाचा आकार वाढला आहे किंवा नाही, फुफ्फुसात पाणी साठलं आहे का किंवा फुफ्फुसाचा विकार आहे का हे याद्वारे जाणून घेतलं जातं.

✻ इकोकार्डिओग्राफीमध्ये ध्वनीलहरी निर्माण होतात. या ध्वनीलहरींमुळे हृदयाची चलत प्रतिमा मिळते. या द्वारे हृदयाच्या आकाराची तपासणी केली जाते. हृदयालगतच्या धमन्या आणि भिंत्तिकांच्या कार्याबाबत जाणून घेतलं जातं. हृदयाला योग्य प्रकारे रक्तपुरवठा होत आहे किंवा नाही हे या चाचणीद्वारे जाणून घेतलं जातं.

✻ कोरोनरी एंजिओग्राफीद्वारे हृदयाच्या स्नायूंना होणाऱ्या रक्तपुरवठ्याविषयी डॉक्टर जाणून घेतात.

वाचा तर खरं

काही अपवाद वगळता प्रत्येक चित्रपट शुक्रवारी प्रदर्शित का होतो हे माहीत आहे का? मंडळी, शुक्रवार, ५ ऑगस्ट १९६० रोजी प्रदर्शित झालेल्या मुगल-ए-आजमला तुफान प्रसिद्धी मिळाली आणि तेव्हापासून शुक्रवारी चित्रपट प्रदर्शित करण्याची पद्धत सुरू झाली. अधिकाधिक लोकांना चित्रपट पहायला मिळावा यासाठी त्याकाळी मुंबईतील कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना हाफ डे देण्यात येत असे. याचं दुसरं कारण म्हणजे हॉलीवूडमध्ये शुक्रवारी चित्रपट प्रदर्शित केले जात असत. हे एकप्रकारे त्यांचं अनुकरणही आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

» Selected

## काळे यांच्या काव्यवाचनाने राजगुरूनगरकर मंत्रमुग्ध



**राजगुरूनगर :** येथील पुस्तकमैत्री बुक गॅलरीच्या संचालिका मयुरी भवारी आयोजित 'कवी आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत मोहन काळे (मुबंई) यांनी सहभाग नोंदविला. कवी काळे यांनी आपल्या विविध कवितांचे वाचन आणि सादरीकरण केले. सामाजिक कविता, आईवरच्या कविता, पावसावरच्या कविता, लहान मुलांसाठी कविता तसेच पुस्तकांवरच्या कविता अशा अनेक कवितांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या प्रभावी शैलीने आणि उत्तम सादरीकरणाने राजगुरुनगरचे श्रोते भारावून गेले. तसेच उपस्थित कवींचीही काव्य मैफिल रंगली. अनेक कवींनी आपल्या स्वरचित रचना सादर केल्या. याप्रसंगी कवी डी. के. वडगावकर, डॉ. अमोल वाघमारे, संदीप पाटील, डॉ. निलम गायकवाड, डॉ. गणेश सोनवणे, रुपाली पाचारणे, दीपक कोबल, अमित शिंदे, केदार बच्चे, प्रणव टिमुने, क्षितिज भवारी, प्रज्योत कोकणे, डॉ. हनुमंत भवारी आदी उपस्थित होते.

# 'त्या' भाच्याला सुनावली जन्मठेप

## एकतर्फी प्रेमातून केली होती हत्या : निकालाबाबत मामा-मामी समाधानी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**खेड :** मामाच्या मुलीवर एकतर्फी प्रेम करून त्या मुलीशी लग्न करायला नकार देणाऱ्या मामाचा परिवार संपवायला निघालेल्या भाच्याला राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस पी पोळ यांनी जन्मठेप व दंडाची शिक्षा सोमवारी (दि १०) सुनावली. या निकाल आणि शिक्षेकडे उत्तर पुणे जिल्ह्या सह खेड तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते. अजित भगवान कान्हुरकर (वय ४०, रा.कान्हुरकर मळा, दावडी, ता. खेड) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपी भाच्याचे नाव आहे.

दरम्यान, आमच्या एकुलत्या मुलावर घातकी हल्ला करून त्याचा जीव घेणाऱ्या भाच्याला फाशीची शिक्षा व्हायला हवी होती.मात्र आयुष्यभर तुरुंगात सडणार असलेली जन्मठेपेची शिक्षा मिळाल्याने आम्ही समाधानी आहोत, अशी प्रतिक्रीया निकाला नंतर मामा शिवाजी खेसे आणि मामीने दिली.

सन २०१८ मध्ये १२ जूनला खेड तालुक्यातील दावडी गावात हा भयंकर गुन्हा घटना घडली होता. प्रवासी भरलेल्या एस टी बस मध्ये मामाच्या एकुलत्या मुलावर कोयत्याने १८ वार करून त्याला जागीच ठार केले होते. अजित कान्हुरकर या भाच्याने हे कृत्य केले. भाचा आणि मामाचा परिवार एकाच गावातला आहे. त्याचे मामाच्या मोठया मुलीवर एकतर्फी प्रेम होते. त्यातुन त्याने तीला व परिवाराला त्रास दिला. त्याच्यावर पोलिसात गुन्हा देखील नोंदविण्यात आला होता. मात्र तरीही मामाने या मुलीशी विवाह लावुन द्यावा असा आरोपीचा आग्रह होता. हा राग मनात धरून मामाचे खानदान संपवणार असे इतर नातेवाईकांना त्याने सांगितले होते. भीती दाखवण्याच्या हेतुने आरोपीने मुलीच्या एकुलत्या भावाचा काटा काढायचा ठरवले. घटना घडली त्या दिवशी भाऊ आणि मुलीची धाकटी बहीण राजगुरुनगर येथे शाळेसाठी एसटी बसने निघाली. त्यावेळी अगोदरच आरोपी मागच्या बाकावर येऊन बसला होता.

बस दावडी थांब्यापासून ५०० मिटर पुढे आल्यावर त्याने मागून येऊन हातात आणलेल्या कोयत्याने बहिणी समक्ष भावावर सपासप वार केले.

यात त्याचा जागीच मृत्यू झाला. श्रीनाथ सुदाम खेसे (वय १८) असे या मृत मुलाचे नाव आहे. पोलीसांनी खुनाचा गुन्हा नोंद करून आरोपीला शोधुन तत्कालिन पोलिस निरिक्षक प्रदीप जाधव यांच्या पथकाने अटक केली. तेव्हापासून आरोपी येरवडा कारागृहात होता. राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात खटला सुरू होता. विशेष नेमणुक करण्यात आलेल्या ॲड सागर कोठारी, सहायक वकील ॲड नारायण पंडित, ॲड विनायक जगनाडे यांनी १६ साक्षीदार तपासले. त्यात फिर्यादी चुलते , मयत मुलाचे वडील सुदाम खेसे, प्रत्यक्षदर्शी लहान बहिण, एसटी बसचे वाहक रहीम अख्तर यांची साक्ष महत्वाची ठरली. पोलिस निरिक्षक अरविंद चौधरी, पोलिस विजय चौधरी यांनी न्यायालयीन कामकाजात सहभाग नोंदवला.

> मुलीचे शिक्षण पुर्ण झाल्यावर लग्नाचा विचार करू असे भाच्याला सांगितले होते. मात्र त्याने आमचे खानदान संपवणार असे इतर नातेवाईकांना सांगितले. सख्खा भाचा असल्याने असे काही घडेल असा विचार देखील केला नव्हता. फाशीची शिक्षा व्हावी अशी अपेक्षा होती. मात्र जन्मठेप सुनावण्यात आली आहे. त्याचे आयुष्य तुरुंगात जाणार आहे. आम्ही समाधानी आहोत. भाच्यामुळे गावात असुनही आमची बहिण आम्हाला कायमची दुरावली याचेही दुःख वाटते.
>
> **-सुदाम खेसे ,** मृत मुलाचे वडील (आरोपीचा मामा)

## प्रश्नमंजूषा स्पर्धेत दिव्या देशमुख व अनुराग धुमाळ प्रथम



**जेजुरी :** सातारा येथील टेक्निकल कॅम्पस, पॅकल्टी ऑफ फार्मसी (डी. फार्म) येथे एमएसबीटीई प्रायोजित राज्यस्तरीय टेक्निकल आयोजित प्रश्नमंजूषा स्पर्धा संपन्न झाली. यामध्ये राज्यभरातील महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेमध्ये पुरंदर तालुक्यातील सासवड येथील सेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थी दिव्या देशमुख व अनुराग धुमाळ यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. सदरची स्पर्धा ही पुणे आणि मुंबई क्षेत्रासाठी घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये ८० विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक सहभागी झाले होते. सासवडचे विद्यार्थी अनुराग धुमाळ आणि दिव्या देशमुख यांनी यात प्रथम क्रमांक तर यशोदा टेक्निकल कॅम्पस, फॅकल्टी ऑफ फार्मसी (डी. फार्म) च्या विद्यार्थीनी तन्वी चव्हाण आणि किरण शिंदे यानी व्दितीय क्रमांक मिळवला. प्रा. आशिष थोरात, प्रा. स्वप्राली सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. विवेक कुमार रेदासानी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. नजिया बागवान, प्रा. आशिष भोंगाळे यांनी सहकार्य केले. दिव्या देशमुख व अनुराग धुमाळ यांच्या यशाबद्दल जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे तसेच वधिरे कॉलेजच्या प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

# पिंपळे जगतापमध्ये बिबट्याचा संचार

## श्वानामुळे वाचली तरुणी, बिबट्याने पळवला दारातील कुत्रा



पिंपळे जगताप येथे पाहणी करताना वनविभागाचे पथक.

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्याचे नागरिकांना दर्शन होऊन कित्येक पाळीव जनावरांसह नागरिकांवर देखील बिबट्याने हल्ले केल्याच्या घटना घडलेल्या असताना नुकतेच पिंपळे जगतापमध्ये बिबट्याने थेट घराच्या दारात येऊन कुत्रा पळवला असून कुत्र्यामुळे तरुणी सुदैवाने बचावली आहे.

पिंपळे जगताप येथील ग्रामपंचायत सदस्या दिपाली तांबे या नातेवाईकांच्या घरी पूजेसाठी, तर त्यांचे सासरे गावामध्ये गेलेले असताना, सायंकाळच्या सुमारास दिपाली तांबे यांची भाची मोनिका घरात बसलेली असताना, अचानकपणे घराच्या चारही बाजूला कंपाउंड असूनही उघड्या गेटमधून बिबट्याने घरात प्रवेश केला. दारामध्ये असलेल्या दोन कुत्र्यांपैकी एका कुत्र्याची शिकार करुन बिबट्या पळून गेला. मात्र, दारामध्ये असलेल्या कुत्र्यामुळेच मोनिका बचावली. घडलेला प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर शिरुर वनविभागाच्या वनपरीमंडल अधिकारी गौरी हिंगणे, वन्यजीव बचाव पथकाचे शेरखान शेख, अमोल कुसाळकर, शुभम वाघ, पोलीस पाटील वर्षा थिटे यांसह आदींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली, तर नागरिकांनी लहान मुलांना एकटे सोडू नये, शेतात जाताना येणारा आवाज करावा, मोबाईलवर गाणी लावावी, रात्रीच्या वेळी बाहेर उजेड ठेवावा, लहान जनावरांना योग्य निवारा करावा, असे आवाहन वनपरीमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांनी केले. वनविभागाने परिसरात पाहणी करत बिबट्या पकडण्यासाठी पिंजरा लावावा अशी मागणी ग्रामपंचायत सदस्या दिपाली तांबे यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** दहावी व बारावीची परीक्षा म्हणजे शालेय जीवनातील महत्वाचे दिवस या काळात विद्यार्थ्यांनी जिद्दीने अभ्यास करत भयमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे, असे प्रतिपादन आयएएस अधिकारी पोलीस प्रशिक्षण विद्यालय लातूरचे प्राचार्य विजयकुमार मगर यांनी केले आहे.

कान्हूर मेसाई येथील विकास मंडळाच्या विद्याधाम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयच्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ दरम्यान मार्गदर्शन करताना आयएएस अधिकारी पोलीस प्रशिक्षण विद्यालय लातूरचे प्राचार्य विजयकुमार मगर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध उद्योगपती आनंदराव तांबे होते, तर याप्रसंगी विक्रीकर विभागाचे सहआयुक्त नरेंद्र कासार, याप्रसंगी विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षा अंजली घोलप, सचिव सदाशिव पुंडे, खजिनदार पोपट तळोले. प्राचार्य श्री. विनोद शिंदे, संचालक विलास पुंडे, रमेश खर्डे, अनिल चौधरी, बबन शिंदे, भास्कर पुंडे, विठ्ठलराव खर्डे, वसंत वाळुंज, मंगेश घोलप, सुधीर पुंडे , दिपक तळोले यांसह शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन पर्यवेक्षक मनोज धुमाळ, बशीर मुलानी, अविनाश दौंडकर, दिपक मोरे, कविता रेटवडे, दगडू दंडवते, धंनजय तळोले, रोहिणी पुंडे, तुषार जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रकाश चव्हाण यांनी केले तर प्रास्ताविक प्राचार्य विनोद शिंदे तर संतोष घोलप यांनी आभार मानले.

## आई वडील हेच तुमचे सर्वस्व



**लोणी-धामणी :** प्रत्येक विद्यार्थ्याने शालेय जीवनात शिकत असताना आपल्या आईवडिलांचा आदर्श, त्यांचे कष्ट डोळ्यसमोर ठेवून अभ्यास करावा व आपल्या आईवडिलांनी जी आपल्या मुलांच्या संदर्भात स्वप्ने पाहिली ती पूर्ण करावीत. त्यासाठी विद्यार्थ्यांना कितीही कष्ट करावे लागले, तर ते त्यांनी करावेत, असे प्रतिपादन घोडेगाव पोलिस स्टेशनचे सहयाक पोलिस निरीक्षक डॉ.किरण भालेकर यांनी केले. निरगुडसर (ता. आंबेगाव ) येथील पं.ज.नेहरू माध्यमिक व द.गो.वळसे पाटील ज्यूनिअर कॉलेज येथे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन व निरोप समारंभ कार्यक्रमात डॉ.भालेकर बोलत होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रदिप वळसे पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना, आपल्या विद्यालयाला,आई वडिलांना व गुरूंना कधीही विसरू नका असा संदेश दिला. यावेळी संस्थेचे उपाध्याक्ष रामदास वळसे पाटील, सचिव प्रकाश तापकीर, संचालक श्रीकांत पवार, माजी प्राचार्या सुनंदा गोरे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. पर्यवेक्षक संतोष वळसे व वैशाली वाबळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार मोहन दरेकर यांनी मानले.

# श्री तुकाईदेवी माघ पौर्णिमा यात्रा उत्सवाची जय्यत तयारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** दौंड तालुक्यातील पारगांव येथे माघ पौर्णिमे निमित्त दि.१२ व १३ रोजी यात्रा उत्सवाची पारगाव ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली आहे. श्री तुकाई मंदिर कळस आकर्षक विद्युत रोषणाईने सजवण्यात आले आहे. यात्रा उत्सवात उंच पाळणे, खेळणी दुकाने, भेळ, जिलबी, शेव, रेवडी, शीतपेय,आईस्क्रीम यांची दुकाने सज्ज झाली आहेत. पारगाव पेठ चौक, पारगाव वि.का.स.सोसायटी चौक कमान ते तुकाई मंदिर संपूर्ण रस्त्याच्या बाजूने आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ग्रामपंचायतच्या वतीने यात्रा उत्सवासाठी पार्किंग व पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रा उत्सव काळात ग्रामस्थांनी व तरुणांनी यात्रेचा आनंद घेत अवश्यक ती खबरदारी घेऊन यात्रा चांगली पार पाडावी, असे आवाहन पारगाव ग्रामपंचायत सरपंच सुभाष बोत्रे यांनी केले आहे. या निमित्त दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.





# घुसखोरांवर कारवाई व्हायलाच हवी; नारायणगाव प्रकरणी भेदभाव नकोत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नारायणगाव :** राजकीय भेदभाव न ठेवता राष्ट्र सुरक्षितता व राष्ट्रहितासाठी घुसखोरी करून नारायणगाव येथे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करावी. १४ दिवसांत सखोल चौकशी करून पोलिसांनी केलेल्या कारवाईबाबत लेखी अहवाल देण्यात यावा, अशी मागणी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल भीमाशंकर जिल्हा पुणे ग्रामीण यांनी निवेदनाद्वारे केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. ऋषिकेश वायकर, अमोल रावत, आदित्य हांडे, पवन हांडे, नामदेव खैरे, अक्षय खोकराळे, जमीर शेख, निलेश डुंबरे, रुपेश खैरे, विवेक कहडणे, गौतम औटी, स्वप्निल काकडे आदींनी नारायणगाव पोलीसांना निवेदन दिले असून निवेदनाची प्रत जुन्नर तहसीलदार व पोलीस अधीक्षकांना पाठविण्यात येणार आहे.

नाशिक शहरातील आडगाव परिसरातून अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या आठ बांगलादेशी नागरिकांवर नुकतीच कारवाई करण्यात आली आहे. तपास करून गुन्हे दाखल करण्याचे काम चालू आहे. आहे. आठ बांगलादेशींपैकी तीन बांगलादेशीं नागरिकांकडे नारायणगाव येथील आधार कार्ड पोलिसांना मिळून आले आहे. नाशिक पोलिसांनी तात्काळ आरोपींना नारायणगाव येथे आणून पुढील चौकशी सुरू केली आहे.

जुन्नर तालुक्यातील नारायणगाव कृषी क्षेत्रातील जागतिक दर्जाची बाजारपेठ असून खोडद येथे आशिया खंडातील विज्ञान संशोधनातला जीएमआरटी सारखा प्रकल्प कार्यरत आहे. नारायणगाव शहरात अवैधरित्या राहत असलेल्या बांगलादेशी नागरिकांमुळे भविष्यात सामाजिक सुरक्षितता व शांततेला धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही असे निवेदनात म्हटले आहे.

### तीव्र उन्हापासून संरक्षण होण्यासाठी

# डाळींबाच्या बागेला कपड्याचे आच्छादन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**लोणी-धामणी :** तीव्र उन्हापासून संरक्षण होण्यासाठी जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील शेतकरी संतोष सावकार भोजने या शेतकऱ्यांने डाळिंब बागेचे संरक्षण करण्यासाठी पांढऱ्या कापडाचे (क्रॉप कव्हर) आच्छादन घातले आहे. यामुळे बागा पांढऱ्या शुभ्र दिसत आहेत.

सध्याच्या वाढत्या तापमानामुळे फळबागांवर टांगती तलवार आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले असून, फळबागांचे संरक्षण कारण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न ते करत आहेत. पुणे जिल्ह्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनी आच्छादन टाकण्यास सुरवात केली आहे. या आच्छादनाने फळबागांना सुरक्षितता मिळण्यास मदत होईल, अशी आशा येथील शेतकऱ्यांना आहे. वाढत्या उन्हाच्या तीव्र उष्णतेमुळे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसह इतर फळ बागायतदार शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून, फळबागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी धावपळ सुरू झाली आहे.

आंबेगाव तालुक्यात घोडनदी, डिंभे धरणाचा उजवा कालवा, डावा कालवा या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत पाणी उपलब्ध होत असल्याने, या भागातील शेतकरी ऊस, कांदा या पिकांबरोबर फळबागांचे उत्पादन घेऊ लागला आहे. सध्या डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना वाढत्या उन्हाचा देखील मोठा फटका बसत आहे. भोजने यांनी साधारण आठ वर्षांपूर्वी दोन एकर क्षेत्रात डाळिंबाची लागवड केली आहे. डाळिंबाची बाग संरक्षित करण्यासाठी आणि बदलत्या वातावरणाचा परिणाम होऊ नये, म्हणून भोजने यांनी दोन एकर डाळिंब बागेला आच्छादन लावून बाग जगविण्यासाठी प्रयत्न केला आहे. यामुळे वाढत्या उन्हापासून डाळिंबाचे फळ वाचण्यास मदत होणार आहे.

### अपेक्षित बाजारभाव आवश्यक

- डाळिंब उत्पादक शेतकरी तुकाराम भोसले म्हणाले की, डाळिंब बागांचे वाढत्या उन्हापासून संरक्षण करण्यासाठी शेतकरी पांढऱ्या कपडाचे ( क्रॉप कव्हर ) गरजेनुसार जुन्या साड्या,कापड याचा वापर करतात. परंतु वादळी वारा किंवा इतर नैसर्गिक संकटामुळे इतर कापड फाटून जाते. म्हणून चांगल्या प्रतीच्या नेटचा वापर करुन डाळिंब बागेला आच्छादन देऊन फळबागा वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी मोठा खर्च येत असून, शेतकरी वर्ग आपले पीक वाचविण्यासाठी अतोनात प्रयत्न करत असतो. मात्र, त्याला शासनाने साथ देणे गरजेचे आहे.

# सेंद्रिय शेतीच्या ओढीने...

pandharisanchar.com

**सध्या लोकांना पोषक, आरोग्यदायी खायचं आहे. म्हणूनच सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या फळं आणि भाज्यांना मागणी वाढते आहे. नोकऱ्यांची कमतरता असणाऱ्या काळात सेंद्रिय शेती हा उत्पन्नाचा चांगला मार्ग बनला आहे. कर्नाटकच्या अमोघ जगतापनेही एमबीए केल्यानंतर सेंद्रिय शेती करायला सुरूवात केली. त्याच्या भरारीविषयी...**

अचिव्हर

इंजिनिअरींग, एमबीए केलेले अनेक तरुण शेतीकडे वळत आहेत. आयटी किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातल्या धकाधकीपेक्षा त्यांना नैसर्गिक वातावरणात शेती करणं आवडू लागलं आहे. कर्नाटकचा अमोघ जगताप अशाच काही तरुणांपैकी एक. अमोघला लहानपणापासूनच शेतीची ओढ लागली. शहरापासून दूर, निवांत ठिकाणी त्याच्या वडिलांनी फार्महाउस विकत घेतलं होतं. २० एकर परिसरात पसरलेल्या या फार्म 'हाउसच्या आसपास शेतीची चांगली संधी असल्याचं अमोघने हेरलं. त्याने बंगळूरूतून एमबीए केलं. यानंतर कॉर्पोरेट क्षेत्रात जायचं की शेतीकडे वळायचं याचा निर्णय त्याला घ्यायचा होता. कॉर्पोरेट ऑफिसच्या कार्यालयात राबण्यापेक्षा जमीन कसायचा निर्णय त्याने घेतला आणि २०१६ मध्ये सेंद्रिय शेतीची सुरूवात केली. तो विविध धान्यं, डाळी, फळं, भाज्यांचं पीक घेतो. या माध्यमातून निसर्गाच्या जवळ जाण्याचा त्याचा प्रयत्न आहे. तो शेतीतून वर्षाला ७ ते १० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न घेतो. इतकंच नाही, तर तो पशुपालन आणि कुक्कुटपालनाचा व्यवसायही करतो.

यासाठी त्याने विविध संकल्पना लढवल्या आहेत. एकाच हंगामात जमिनीच्या एकाच तुकड्यावर दोन प्रकारची पिकं घेण्याचा प्रयोग त्याने केला. तो यशस्वी ठरला. कर्नाटकमधल्या मल्लावल्लीतल्या त्याच्या शेतात नारळाची ८०० झाडं आहेत. रक्तचंदनाची आणि साध्या चंदनाची प्रत्येकी एक हजार झाडं आहेत. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून तो पाण्याची बचत करतो.



विक्रीच्या बाबतीतही त्याने नव्या पद्धती आणल्या आहेत. मध्यस्थांना त्याने बाजूला सारलं आहे. आपली उत्पादनं थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ग्रीन व्हॅली नावाचं दुकान त्याने सुरू केलं आहे. मालावल्ली–म्हैसूरला जोडणाऱ्या रस्त्यावर त्याचं हे दुकान आहे. भाज्या, फळं, धान्यांसोबतच मध, गायी–म्हशीचं दूध आणि इतर दुग्धजन्य उत्पादनंही तो विकतो. मुख्य रस्त्यावर शेतकऱ्यांचा बाजार भरवतो. इथे सेंद्रिय शेती करणारे इतर शेतकरीही येतात. आपल्या उत्पादनांची विक्री करण्याची संधी त्यांना मिळते. या निमित्ताने तो अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतो. इतर शेतकऱ्यांच्या उत्पदनांना योग्य भाव मिळावा असाही त्यांचा प्रयत्न असतो.




## फंडू एसएमएस

✻ तुझे महसूस करने का हर अहसास अजीब है, तू पास है तो पास है, जब दूर है तो भी पास है।

✻ हमें कहां मालूम था की इश्क होता क्या है, बस एक 'तुम' मिले और जिंदगी मोहब्बत बन गई।

✻ मेरे 'शब्दों' को इतने ध्यान से ना पढो दोस्तों, कुछ याद रह गया तो मुझे भूल नहीं पाओगे।

स्मार्ट टिप्स

## स्मार्टफोनची मेमरी फुल झाली तर...

आपल्या स्मार्टफोनमध्ये बरंच काही साठलेलं असतं. त्यामुळे मेमरी फुल होऊन जाते. अशा वेळी काय करायचं? पाहू या.




✻ अनवॉन्टेड फाईल्स डिलिट करा.

✻ नको असलेले फोटो आणि व्हिडिओ काढून टाका. व्हॉट्स ॲपमधला ऑटो डाउनलोडचा पर्याय काढून टाका.

✻ नको असलेली ॲप्स डिलिट करा.

✻ मोबाईलमध्ये कॅचे साठून राहतात. ते काढून टाका.

# सुपर ट्रेंडी शर्ट्स

फॅशन पॅशन


मित्रांनो, एखादा छानसा शर्ट तुमचा लूक पटकन खुलवू शकतो. ऑफिस पार्टी असो, मीटिंग असो किंवा व्हॅलेंटाईन्स डे डेट असो शर्टचे काही ट्रेंडी पर्याय कोणत्याही ऑकेजनची शान ठरतात. टिपिकल प्लेन, स्ट्राईप्स किंवा चेक्सवाल्या शर्टपेक्षा काहीतरी वेगळं ट्राय करायचं असेल तर हे पर्याय खास तुमच्यासाठी आहेत.

✻ कलरब्लॉक्ड म्हणजे दोन रंगांचा सॉलिड शर्ट तुमच्याकडे असायला हवा. त्यातही व्हाईट आणि ग्रे कॉम्बिनेशन खूपच भारी दिसतं. उन्हाळा असो किंवा हिवाळा, पार्टी असो डेट... हा शर्ट कोणत्याही प्रसंगी शोभून दिसेल. अशा शर्ट तुमच्या वॉर्डरोबमध्ये असायलाच हवा.

✻ तुम्हाला प्रिंट्स आवडत असतील तर प्रिंटेड कॉटन शर्ट खरेदी करता येईल. डिसेंट प्रिंट्सचे शर्टही मिळतात. प्रिंटेड व्हाईट शर्ट खूपच खुलून दिसतो. असा शर्ट कोणत्याही रंगाच्या ट्राउझरवर घालता येईल.

✻ तुम्हाला जास्तच स्टायलिश दिसायचं असेल तर प्रिंट आणि स्ट्राईप्सचं कॉम्बिनेशन असणारा शर्ट कॅरी करता येईल. ब्लॅक अँड व्हाईट किंवा व्हाईट अँड ब्लू असं कॉम्बिनेशन तुम्ही करू शकता.

✻ ट्रॉपिकल प्रिंट्स आवडत असतील तर असे शर्टस घालता येतील. पांढऱ्या रंगाचा ब्लॉसम प्रिंट कॉटन शर्ट खरेदी करता येईल. हा शर्ट जीन्सवर खूप छान दिसेल. त्यासोबत स्नीकर्स घाला आणि कॅज्युअल दिसा.



✻ सौम्य फ्लोरल प्रिंटवाले शर्ट भाव खाऊन जातात. तुम्ही असे शर्ट घेऊ शकता. पांढऱ्या रंगावर फ्लोरल प्रिंट्स शोभून दिसतात. कॅज्युअल ऑकेजनसाठी जीन्सवर हा शर्ट घाला आणि ऑफिसला जाताना ट्राउझर कॅरी करा.

✻ जिओमॅट्रिक प्रिंट्स इन आहेत. अशा प्रिंटचा पिवळ्या रंगाचा शर्ट शोभून दिसेल. ब्रंच किंवा कॉफी डेटसाठी हा शर्ट परफेक्ट आहे.

✻ पार्टी वेअर प्रिंटेड श[…] तुमच्याकडे असायला हवा. नेव्[…] ब्लू प्रिंटेड शर्ट खास दिसेल.

✻ एखादा चेक्सवाला […] घ्यायला हरकत नाही. थोडे मो[…] आकाराचे चेक्स शोभून दिसती[…] नेव्ही ब्लू चेक्स शर्ट हटके दिसेल.

# दाढीधारी बनण्यासाठी

ग्रुमिंग

मुलांचा चिकना चुपडा, तुळतुळीत दाढी केलेला चेहरा मुलींना आवडेनासा झाला आहे म्हणे... म्हणूनच का सध्या सगळे गब्रू जवान दाढीधारी झाले आहेत? पण मित्रांनो, हा रफ अँड टफ लूक तुम्हाला खूप छान दिसतो बरं का... गरज आहे ती दाढीच्या जपणुकीची. काही टिप्स फॉलो करा आणि बघा, तुम्हीही रितेश, ऋतिक, अजय, सिद्धार्थ, वरुण, रणवीरच्या पंक्तीत आरामात जाऊन बसाल. अगदी प्राचीन काळापासून दाढी हे पुरुषांच्या शक्तीचं प्रतीक मानलं गेलं आहे. दाट आणि मजबूत दाढी पुरुषांची पोलादी ताकद दर्शवतं. म्हणूनच दाढी राखणं हे अनेक युवकांचं स्वप्न असतं. त्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. पण लक्षात घ्या, दाढी वाढण्याची गती आणि मजबुती वय आणि जेनिटिकवर अवलंबून असते. ✻ दाढी लवकर वाढावी यासाठी आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचं सेवन वाढवावं. प्रोटीन्सअभावी दाढी खुरटी राहते. ✻ दाढी वाढवण्याच्या प्रयत्नात असाल तर पुरेशी झोप घ्या. ✻ दिवसातून आठ ग्लास पाणी प्यायलाच हवं. यामुळेही दाढी लवकर वाढेल.



✻ केस गळू नयेत यासाठी तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. ✻ वेळोवेळी चेहऱ्यावरील मृत त्वचेचा थर दूर करत राहिल्यास दाढी वाढण्यास मदत होते. त्यामुळे पुरुषांसाठी असणाऱ्या एक्सफोलिएट मास्कचा वापर करेल. नवीन केस येण्यास मदत होईल. ✻ दाढी वाढवण्यासाठी संयम राखायला हवा. एकदा दाढी चांगली वाढली की मधल्या गॅप्स भरल्या जातात आणि हवा तसा लूक मिळतो. ✻ एकदा दाढी वाढली की तिची निगा राखा. यासाठी चांगल्या दर्जाच्या कंडिशनरचा वापर करा. यासाठी एरंडेल तेल सर्वोत्तम समजलं जातं. तुम्ही खोबरेल तेल, ऑलिव्ह ऑईल, पेपरमिंट ऑईलने मसाज करा. यामुळेही योग्य पोषण मिळेल आणि दाढी चांगली दिसेल. ✻ दाढी चांगली राहण्यासाठी आहारात व्हिटॅमिन बी १, बी ६, बी १२ युक्त पदार्थांचा वापर करावा. यामुळे केसांचं उत्तम पोषण होईल.

# नातं योग्य आहे का?

मॅच मेकिंग

मी आर्थिकदृष्ट्या सक्षम २७ वर्षांची तरूणी असून पाच वर्षांनी लहान असलेल्या मुलाच्या प्रेमात पडले आहे. आम्ही शेजारी आणि बालपणीचे मित्र आहोत. आमच्या कुटुंबियांना हे नातं मान्य होणार नाही, याची मला कल्पना असली तरी या नात्याला एक संधी द्यावी, असं मला वाटतं. बहुतेक त्यालाही मी आवडते. दुसरं म्हणजे तो फक्त २२ वर्षांचा असून मास्टर्स अभ्यासक्रमाची तयारी करत आहे. या नात्याचं मर्म त्याला कळेल का? वयातल्या अंतरामुळे भविष्यात काही समस्या निर्माण होतील का? मी खूप गोंधळून गेले आहे.



**उत्तर** :बराच काळ एकत्र घालवल्यानंतर एखाद्याबद्दल आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे. पण हे फक्त आकर्षण आहे का प्रेम, हे जाणून घे. त्यातच त्याला तू आवडतेस किंवा नाही याबद्दल निश्चित असं काहीच सांगता येत नाही. त्यामुळे याबाबत स्पष्टपणे बोल. त्याला आत्ता नातेसंबधात अडकायचं आहे का, हे जाणून घे. अवघा २२ वर्षांचा हा मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर झालेला नाही. त्यामुळे तू एखाद्या समुपदेशकाची मदत घे. भविष्याचा विचार सध्या तरी करू नकोस. सद्यस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न कर. नात्यात समर्पण आणि विश्वासाची गरज असते. वयातल्या अंतरावर मात करून अनेकजण सुखी संसार करत आहेत. पण आधी या मुलाच्या मनातलं जाणून घे आणि मगच पुढे जा.

# पास्त्याला द्या ट्विस्ट

झटपट रेसिपी

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडत असेल. भरपूर चीज घातलेला, रेड किंवा व्हाईट सॉसमधला पास्ता बघितला की तोंडाला पाणी सुटतं. याच पास्त्याला आपण देसी ट्विस्ट देऊ शकतो. हा पास्ता करायची पद्धत अगदी सोपी आहे. चला तर मग, या इंडियन स्टाईल पास्ताची रेसिपी जाणून घेऊ या.

**साहित्य** : एक कप पास्ता, चार कप पाणी, चिरलेला कांदा, टोमॅटो, चमचाभर आलं–लसूण पेस्ट, दोन हिरव्या मिरच्या चिरून घ्या. लाल तिखट, गरम मसाला, एक चमचा मैदा, तीन चमचे दूध, ऑलिव्ह ऑईल(नेहमीचं तेलही चालेल), मीठ, चिरलेली कोथिंबिर

**कृती**: भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात थोडं मीठ आणि तीन ते चार थेंब तेल घाला. पाणी उकळल्यावर त्यात पास्ता घाला. सहा ते आठ मिनिटं शिजवून घ्या. पाणी काढून पास्ता बाजूला ठेवा. कढईत दोन चमचे तेल गरम करा. कांदा आणि हिरव्या मिरच्या परतून घ्या. त्यात आलं लसूण पेस्ट घालून हलवा. यानंतर टोमॅटो घालून शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजले की त्यात मैदा घाला. परतून घ्या. यात दूध, चवीनुसार लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला. दूध नको असेल तर त्याऐवजी पास्ता शिजवलेलं पाणी घालता येईल. आता सर्व पदार्थ एकजीव करा. मीठ आणि तिखटाचं प्रमाण थोडं जास्त ठेवा. कारण आपल्याला अजून पास्ता घालायचा आहे. या मसाल्यात पास्ता घालून नीट हलवून घ्या. पास्त्याला नीट मसाला लागला पाहिजे. गॅस बंद करा. वरून कोथिंबिर घाला. गरमागरम खा.



हाऊ टू

## आयफोनचा पासवर्ड विसरलाय?



आयफोनचा पासवर्ड विसरल्यानंतर आपली भंबेरी उडू शकते. हा पासवर्ड मिळवण्यासाठी ॲपलच्या सर्व्हिस सेंटरला भेट द्यावी लागते. अर्थात काही स्टेप्स फॉलो करून आयफोन अनलॉक करता येईल. मात्र यातला डाटा डिलिट होईल.

✻ सर्वात आधी मॅकबुक किंवा विंडोज पीसीमध्ये आय ट्यून्स ॲप डाउनलोड करून ते ओपन करा.


✻ आता आयफोन फोर्स रिस्टार्ट करायचा आहे. यासाठी व्हॉल्यूम आणि पॉवर बटण एकत्र दाबून सोडावं लागेल.

✻ यानंतर तुम्हाला रिस्टोअर किंवा अपडेटचा पर्याय दिसेल. यापैकी रिस्टोअर पर्याय निवडा. यानंतर आयट्यून तुमच्या फोनसाठी सॉफ्टवेअर डाउनलोड करेल. यासाठी साधारण १५ मिनिटं लागतील. यानंतर आयफोन 'रिकव्हरी मोड'मधून बाहेर पडेल.

व्हॉट्स न्यू?

## योगासने शिका ॲपवर!

फिटनेससाठी हजारो ॲप्स उपलब्ध आहेत. त्यावरून वर्कआऊटसाठी वेगवेगळे व्यायामप्रकार शिकता येतात. आता योगासनांसाठी सुद्धा अशी ॲप्स आली आहेत. या ॲप्सवरून तज्ज्ञांच्या मदतीने योगासनं शिकता येतील. यातील काही ॲप्स विनामूल्य आहेत तर काही ॲप्सवर अत्यल्प फी भरावी लागते. सध्या ॲप्सवरून योगासनं शिकण्याचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अशी ॲप्स तयार होण्याचं प्रमाणही वाढत आहे. पण कोणत्याही ॲपवरून योगासनं शिकताना आधी खातरजमा करून घ्या. ॲपवरील माहिती गुगल किंवा जाणकारांकडून क्रॉसचेक करून घ्या. आपल्या वेळेनुसार योगासनं शिकता येतात हा या ॲपचा महत्त्वाचा फायदा आहे. अनेकांना व्यस्त दिनचर्येमुळे योगासनांच्या क्लासला जाता येत नाही. अशांसाठी ही ॲप्स महत्त्वपूर्ण ठरतात.



सोशल मिडिया

## असं करा गुगल सर्च...

दोस्तांनो, माहिती कोणतीही असो, ती शोधण्यासाठी आता पुस्तक उघडण्याची गरज राहिलेली नाही. गुगलने आपल्या सगळ्या समस्या सोडवल्या आहेत पण गुगल सर्च करताना काही अडचणी येऊ शकतात. या टिप्सनी तुम्ही झटपट गुगल सर्च करू शकता. ✻ स्पेलिंग सर्च करायचं असेल तर त्या शब्दाशी संबंधित दोन–चार अक्षरं लिहा. या अक्षरांच्या मध्ये '&' किंवा 'or' हा शब्द टाकून सर्च करा. स्पेलिंग लवकर सापडेल. ✻ वेबसाईट सर्च करताना साईटशी संबंधित माहिती लिहा. मध्ये 'ब' चिन्ह टाका. साईट्स मिळतील. ✻ एखाद्या साईटवरचा ठराविक लेख वाचायला असेल तर साईट ॲड्रेस टाकून लेखाचा विषय टाका. लेख लवकर सापडेल. ✻ टायटल किंवा यूआरएल शोधायचं असेल तर intitle: लिहून तो शब्द लिहा. ✻ एकाच प्रकारच्या वेबसाईट्स शोधायच्या असतील तर related: टाकून ती साईट टाका.

# अनुभवा सर्फिंगचा थरार

भटकंती

आपल्या भारतातही वॉटर स्पोर्टस बरंच लोकप्रिय होत आहे. स्कुबा डायव्हिंग, रिव्हर राफ्टींग, सर्फिंग, मोटर बोटची सफर असे बरेच पर्याय उपलब्ध आहेत. वॉटर स्पोर्टसचा थरार वेगळाच असतो. तुम्हाला सर्फिंग करावंसं वाटत असेल तर भारतातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांना भेटी देता येतील. सर्फिंगचे हे काही देसी पर्याय...

✻ वॉटर स्पोर्टसचा भन्नाट अनुभव घेण्यासाठी पुड्डूचेरीला भेट द्या. इथले स्वच्छ आणि सुंदर समुद्रकिनारे तुम्हाला आकर्षित करतील. इथल्या समुद्रातल्या लाटांवर स्वार होऊन मस्तपैकी सर्फिंग करता येईल. इथला सेरेनिटी समुद्रकिनरा सर्फिंगसाठी प्रसिद्ध आहे. तसंच अन्य आकर्षक समुद्रकिनारेही आहेत.

✻ केरळ हे भारतातल्या सुंदर राज्यांपैकी एक. केरळचा कोवलम समुद्रकिनारा खूप प्रसिद्ध आहे. इथेही सागराच्या उंच उंच लाटांवर स्वार होऊन सर्फिंगचा आनंद लुटता येईल.

✻ कर्नाटकमधल्या गोकर्णचा समुद्रकिनारा खास आहे. हा समुद्रकिनारा पर्यटकांचं खास आकर्षण ठरतो. हा समुद्रकिनाराही सर्फिंगसाठी उत्तम मानला जातो. इथे बरेच पर्यटक सर्फिंगसाठी येतात. इथल्या महाबळेश्वर मंदिराला भेट दिल्यानंतर लोक गोकर्णच्या समुद्रकिनाऱ्यावर येऊन सर्फिंगचा थरार अनुभवतात. तुम्हीही अशी एखादी सहल ठरवू शकता.

✻ गोवा हे पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. देशाविदेशातले पर्यटक गोव्याला भेट देत असतात. इथले शांत आणि सुंदर समुद्रकिनारे पर्यटकांचं मन मोहवून टाकतात. इथला निसर्ग प्रेमात पाडतो. गोव्यातही सर्फिंगची संधी मिळते. इथे बरेच सर्फिंग पॉईंट्स आहेत. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत सर्फिंग करता येईल.

यंदा पर्यटनाच्या काही वेगळ्या वाटा निवडून आनंद द्विगुणित करता येईल.



# इंजिनिअरिंग इन रबर टेक्नॉलॉजी


वेगळ्या वाटा

दोस्तांनो, इंजिनिअरींग म्हटलं की ठराविक शाखांचा विचार मनात येतो. सॉफ्टवेअर, कॉम्प्युटर, सिव्हिल, ऑटोमोबाईल या इंजिनिअरींगच्या कॉमन शाखा आहेत. सहसा कुणी या पर्यायांपलीकडे बघत नाही. पण इंजिनिअरींगचं क्षेत्र प्रचंड मोठं आहे. सरधोपट शाखा निवडायच्या नसतील तर रबर टेक्नॉलॉजीचा पर्याय तुमच्याकडे आहे.

✻ रबराचा वापर प्रत्येक क्षेत्रात केला जातो. रबर टेक्नॉलॉजी ही इंजिनिअरींगची शाखा असेल असा विचार आपल्या मनात सहसा डोकावत नाही. पण या क्षेत्रात तुम्ही उत्तम भविष्य घडवू शकता.

✻ रबर टेक्नॉलॉजीत रबराच्या विविध वस्तू घडवल्या जातात. नैसर्गिक रबरापासून लेटेक्स आणि सिंथेटिक रबरवर प्रक्रिया केली जाते. या रबरांपासून वेगवेगळी उत्पादनं बनवली जातात.

✻ बारावीत फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित हे विषय घेऊन रबर टेक्नॉलॉजी निवडता येईल. रबर टेक्नॉलॉजीशी संबंधित अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बीई, बीटेक, डिप्लोमा यापैकी कोणताही पर्याय तुम्हाला निवडता येईल.



✻ हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर टेस्टिंग टेक्नॉलॉजिस्ट, टेक्निशियन, प्रोडक्शन इंजिनिअर, पॉलिमर स्पेशलिस्ट, मटेरियल टेक्नॉलॉजिस्ट अशा विविध पदांवर काम करता येईल.

✻ रबर क्षेत्रासोबतच ऑटोमोबाईल क्षेत्रातही तुम्ही काम करू शकता. सरकारी क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत.

✻ गुजरात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, गांधीनगर, इंडियन रबर इन्स्टीट्यूट कोलकाता, हिंदुस्तान कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, चेन्नई, आयआयटी खरगपूर या ठिकाणी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

## At a Glance

### बांगलादेशचे मंत्री जयशंकर यांना भेटणार

**ढाका :** बांगलादेशचे परराष्ट्र व्यवहार सल्लागार मोहम्मद तौहिद हुसेन पुढील आठवड्यात ओमानयेथे होणाऱ्या हिंदी महासागर परिषदेच्या निमित्ताने परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेण्याची शक्यता आहे. आठवी हिंद महासागर परिषद १६ ते १७ फेब्रुवारी दरम्यान मस्कत येथे होणार आहे. ओमानच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या सहकार्याने नवी दिल्लीस्थित रिसर्च इन्स्टिट्यूट इंडिया फाऊंडेशनने आयोजित केलेली ही परिषद प्रादेशिक संवादाचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

### मुख्य अभियंत्यावर लाचखोरीचा गुन्हा

**उधमपूर :** श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पाच्या कटारा-धरम सेक्शनच्या बांधकामात गुंतलेल्या कंपनीची थकीत बिले अदा करण्यासाठी लाच घेतल्याप्रकरणी सीबीआयने कोकण रेल्वेच्या मुख्य अभियंत्यावर गुन्हा दाखल केला आहे.

### पोलिसांकडून सैन्याच्या तयारीचा आढावा

**जम्मू :** चिनाब खोऱ्यातील डोडा, किश्तवाड आणि रामबन जिल्ह्यातील ऑपरेशनल तयारीबाबत जम्मूचे पोलिस महानिरीक्षक भीम सेन तुती यांनी सोमवारी उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. रामबनमधील बटोटे येथील रेंज पोलिस मुख्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गेल्या वर्षी विशेषत: डोडा आणि किश्तवाड मध्ये अनेक दहशतवादी घटनांनी हादरलेल्या भागात सैन्याच्या तैनातीबाबत सविस्तर चर्चा केली.

# पंतप्रधान मोदी विदेश दौऱ्यावर

## फ्रान्स आणि अमेरिकेला देणार भेट, एआय शिखर परिषदेतही सहभाग

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. १० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी असा तीन दिवसांचा पंतप्रधान मोदी यांचा फ्रान्स दौरा असेल. त्यानंतर त्यांचा २ दिवसांचा अमेरिका दौरा आहे. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच दौरा आहे. या दोन देशांच्या दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी जारी केलेल्या निवेदनानुसार, फ्रान्सच्या भेटीदरम्यान ते पॅरीसमध्ये एआय शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी दिलेल्या निमंत्रणानुसार मी १० ते १२ फेब्रुवारी या दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहे. पॅरिसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक कृती शिखर परिषदेचे सहअध्यक्षपद भूषविण्यासाठी उत्सुक आहे. या शिखर परिषदेत जगभरातील नेते आणि तंत्रज्ञान क्षेत्रातले जगभरातले अनेक मुख्य कार्यकारी अधिकारी एकत्र येणार आहेत, असे ते म्हणाले. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा व्यापक सार्वजनिक हितासाठी सर्वसमावेशक, सुरक्षित आणि विश्वासार्ह पद्धतीने वापर करण्यासंबंधीच्या परस्पर सहकार्याच्या दृष्टिकोनावर विचारांची देवाणघेवाण होणार असल्याचे ते म्हणाले.

या दौऱ्यातील द्विपक्षीय भेटींच्या नियोजनाअंतर्गत, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्यासोबत भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारीसाठी २०४७ होरायझन रोडमॅपसंबंधीच्या प्रगतीचा आढावा घेतला जाणार असल्याचे ते म्हणाले. फ्रान्समधील मार्सेल या शहरात पहिल्या भारतीय वाणिज्य दूतावासाचे उद्घाटन, थर्मोन्यूक्लिअर एक्सपेरिमेंटल रिॲक्टर प्रकल्पाला भेट, यूद्ध स्मारकाला भेट देऊन पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या भारतीय सैनिकांनाही ते श्रद्धांजली अर्पण करणार आहेत.

फ्रान्सचा दौरा आटोपल्यानंतर पंतप्रधान मोदी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निमंत्रणाला प्रतिसाद म्हणून २ दिवसांच्या अमेरिका दौऱ्यासाठी रवाना होणार आहे. मी माझे मित्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना भेटण्यासाठी उत्सुक आहे, असे ते म्हणाले. ही भेट दोन्ही देशांमधील परस्पर सहकार्याच्या यशाच्या पायावर नवी उभारणी करण्याची तसेच तंत्रज्ञान, व्यापार, संरक्षण, ऊर्जा आणि पुरवठा साखळीतील लवचिकता या क्षेत्रांसह दोन्ही देशांमधील परस्पर भागीदारीला नवी उंची मिळवून देण्यासाठी तसेच ती अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यक्रम आखण्याची संधी असणार आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

## वक्फ विधेयक सादर होत असतानाच

# कर्नाटक उच्च न्यायालयाचे प्रश्नचिन्ह



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** संसदेने पुन्हा वक्फ विधेयक आणण्याची तयारी सुरू केली असताना कर्नाटक उच्च न्यायालयाने वक्फ बोर्डाच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सोमवारी एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने म्हटले की, राज्य वक्फ बोर्ड मुस्लिम जोडप्यांना विवाह आणि घटस्फोट प्रमाणपत्र कसे देऊ शकते. वक्फ बोर्डाला प्रमाणपत्र देण्याचे अधिकार देण्याच्या सरकारी आदेशाला न्यायालयाने गेल्या वर्षी स्थगिती दिली होती. ३० ऑगस्ट २०२३ रोजी हा आदेश जारी करण्यात आला होता. वक्फ बोर्ड आणि संबंधित जिल्हा अधिकारी मुस्लिम जोडप्यांना प्रमाणपत्र देऊ शकतात, असे आदेशात म्हटले आहे.

**अल्पसंख्यांक**

उच्च न्यायालयाने कर्नाटक सरकारला या प्रकरणी उत्तर दाखल करण्यासाठी आणखी काही वेळ दिला आहे. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ फेब्रुवारीरोजी होणार आहे. मुख्य न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया आणि न्यायमूर्ती एमआय अरुण यांच्या खंडपीठाने म्हटले की, वक्फ प्राधिकरण विवाह आणि घटस्फोटाचे प्रमाणपत्रही देत आहे. या प्रकरणी उत्तर दाखल करण्यासाठी आम्ही तुम्हाला आणखी वेळ देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. वक्फ कायद्यानुसार प्रमाणपत्र देण्याचा अधिकार तुम्हाला नाही. या प्रकरणी आलम पाशा नावाच्या व्यक्तीने न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. राज्य सरकारच्या आदेशाला त्यांनी आव्हान दिले होते. यात त्यांनी वक्फ बोर्डाचे अधिकारी सरकारी मान्यता प्रमाणपत्र कसे देऊ शकतात, असा सवाल केला होता.

याचिकाकर्त्याने न्यायालयात सांगितले की, ते काझी मुस्लिमांचे विवाह करतात. शासनाने आपल्या आदेशानुसार त्यांना प्रमाणपत्र देण्याचे अधिकार दिले आहेत. वक्फ बोर्डाच्या वतीने त्यांना प्रमाणपत्र देता येणार आहे. काझी कायदा १९८८ अन्वये हा आदेश जारी करण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे. २०१३ मध्ये हा कायदा मागे घेण्यात आला, पण राज्य सरकारने त्यासंदर्भातील आदेश काढला. याचिकेत म्हटले आहे की, वक्फ कायदा केवळ जंगम आणि स्थावर मालमत्तेबाबत निर्णय घेऊ शकतो. त्याला लग्नाचे दाखले वगैरे देता येत नाहीत.

# २५ हजार शिक्षकांचा प्रश्नी निकाल राखला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील २५,७५३ शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. यापूर्वी कलकत्ता उच्च न्यायालयाने या नियुक्त्या बेकायदेशीर ठरवून स्थगिती दिली होती.

कलकत्ता उच्च न्यायालयाच्या २२ एप्रिल २०२४ च्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी निकाल राखून ठेवला. उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात पश्चिम बंगालमधील सरकारी आणि सरकारी अनुदानित शाळांमधील २५ हजार ७५३ शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती बेकायदेशीर ठरवली होती.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने सांगितले की, युक्तिवाद ऐकला गेला. निर्णय राखून ठेवण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी १२४ याचिकांवर सुनावणी केली, ज्यात पश्चिम बंगाल सरकारने दाखल केलेल्या याचिकेचाही समावेश आहे.

या खटल्यात विविध बाजूंच्या वतीने ज्येष्ठ वकिलांच्या मोठ्या पथकाने युक्तिवाद केला. यात मुकुल रोहतगी, रणजीत कुमार, अभिषेक सिंघवी, दुष्यंत दवे, पी. एस. पटवालिया, राकेश द्विवेदी, मनिंदर सिंह, श्याम दीवान, प्रशांत भूषण, मीनाक्षी अरोरा आणि करुणा नंदी यांचा समावेश होता.

# सोलापूरकर यांनी आडनाव बदलावे

## उबाठा गटाच्या वतीने आंदोलने

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत वादग्रस्त विधान केल्याने आंबेडकरी प्रेमी जनता संताप व्यक्त करीत आहे. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या वतीने सोमवारी सोलापूर शहरातील आंबेडकर चौकात राहुल सोलापूरकरांच्या विरोधात जोरदार आंदोलन करण्यात आले. सोलापूरकर याच्या बॅनरला जोडे मारून निषेध करण्यात आलाय. विशेष म्हणजे शिवसेनेच्या महिला पदाधिकाऱ्याने प्रतिक्रिया देताना संताप व्यक्त केलाय.

राहुल सोलापूरकर यांनी स्वतःचे आडनाव बदलून घ्यावे, त्यांच्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या नावाचा अपमान होतोय. राज्य उपनेते शरद कोळी यांनी राहुल सोलापूरकर यांच्याविरोधात संतप्त प्रतिक्रिया दिलीय.

अभिनेते राहुल सोलापूरकर नेहमीच वादग्रस्त विधान करीत असतात. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या वतीने १ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आलंय. राहुल सोलापूरकर याला जो कुणी मारेल, त्याला आम्ही १ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस देऊ, असे जाहीरपणे शिवसेनेचे वतीने घोषणा केलीय. ठाकरेंच्या शिवसेनेचे उपनेते शरद कोळी यांनी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलंय.

### सुरुवात तुम्ही केली, शेवट मी करणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** 'सुरूवात तुम्ही केली आहे. शेवट मी करणारच', असा मोबाईलवर स्टेटस ठेऊन विधान परिषदेचे माजी सभापती तथा राष्ट्रवादीचे आमदार रामराजे नाईक-निंबाळकर यांनी आपल्या विरोधकांना थेट इशारा दिलाय. स्टेटसमध्ये कुणाचा नामोल्लेख नसला तरी रामराजेंचा इशारा हा मंत्री जयकुमार गोरे आणि माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकरांना असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. रामराजे नाईक-निंबाळकरांचे चुलत बंधू संजीवराजे आणि रघुनाथराजेंच्या मुंबई, पुणे आणि फलटणमधील निवासस्थानांवर तसेच फलटणमधील संस्थांवर इन्कम टॅक्स विभागानं ५ फेब्रुवारी रोजी पहाटे धाडी टाकल्या होत्या.

# जनगणना लवकरात लवकर करा- सोनिया गांधींची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत सर्व पात्र व्यक्तींना खात्रीशीर लाभ मिळावा, यासाठी जनगणना लवकर करावी, अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि पक्षाच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी सोमवारी केली. राज्यसभेत शून्य प्रहरात हा मुद्दा उपस्थित करताना सोनिया म्हणाल्या की, अन्न सुरक्षा हा विशेषाधिकार नसून नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे.

यूपीए सरकारने आणलेला राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा हा १४० कोटी लोकसंख्येला अन्न आणि पोषण सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने एक ऐतिहासिक उपक्रम असल्याचे त्या म्हणाल्या. विशेषत: महामारीच्या संकटकाळात लाखो असुरक्षित कुटुंबांना उपासमारीपासून वाचविण्यात या कायद्याने महत्त्वाची भूमिका बजावली आणि पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेचा आधारही प्रदान केला.

राहुल गांधी म्हणाले की, अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत ७५ टक्के ग्रामीण तसेच ५० टक्के शहरी जनतेला सवलतीच्या दरात धान्य मिळण्याचा हक्क आहे. मात्र, लाभार्थ्यांचा कोटा अजूनही २०११ च्या जनगणनेच्या आधारे निश्चित केला जातो, जो आता दहा वर्षांहून अधिक जुना झाला आहे, असा आरोप त्यांनी केला.


### सलग चौथ्या दिवशी घसरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा नवीन आयात कर लागू करण्याच्या इशारा आणि विदेशी गुंतवणूकदारांकडून सततच्या विक्रीचा परिणाम सोमवारी भारतासह संपूर्ण आशियाई शेअर बाजारात दिसून आला. आज सलग चौथ्या सत्रांत सेन्सेक्स- निफ्टी घसरले. सेन्सेक्स ५४८ अंकांनी घसरून ७७,३११ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १७८ अंकांच्या घसरणीसह २३,३८१ वर स्थिरावला. विशेषतः आज मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्ये जोरदार विक्री राहिली. बीएसई मिडकॅप निर्देशांक २ टक्के आणि स्मॉलकॅप २.२ टक्के घसरून बंद झाला. इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांकही लाल रंगात बंद झाले. मेटल, फार्मा, युटिलिटी आणि कन्झ्यमूर ड्युरेबवल्स शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण दिसून आली.

## हमासी अंत्यसंस्कार

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**गाझा पट्टी** इस्रायल आणि हमास यांच्यात युद्धबंदी लागू झाली असली, तरी संघर्षा दरम्यान, इस्रायली हल्ल्यात मारल्या गेलेल्या हमासी दहशतवाद्याच्या अंत्यसंस्कारावेळी हमासचे दहशतवादी रॉकेट लॉंचर घेत सहभागी झाले.

### उद्योग सचिवांवर नाराज नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उद्योगमंत्री उदय सामंत हे गेल्या काही दिवसांपासून उद्योग विभागाच्या प्रधान सचिवांवर नाराज असल्याची चर्चा होती. दरम्यान, मंत्री उदय सामंत यांनी उद्योग विभागाच्या प्रधान सचिवांच्या कार्य प्रणालीवर नाराजी व्यक्त करणारे पत्र लिहिले होते. मात्र मी कुठेही उद्योग विभागाच्या प्रधान सचिवांवर नाराज नाही. नाराज असण्याचे कारण नाही, असा खुलासा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज केलाय. मी उद्योगमंत्री या नात्याने ४ फेब्रुवारी रोजी उद्योग खात्याच्या प्रधान सचिवांना पत्र लिहिले. पण हे पत्र तुमच्या हाती उशिरा मिळाले. मंत्री म्हणून प्रशासनाचे जे धोरणात्मक निर्णय होतात, त्याची कल्पना मला असावी, अशी पत्रातून अपेक्षा व्यक्त केली.

# महाकुंभसाठी दिवसाला ३३० गाड्या- रेल्वे मंत्री

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** महाकुंभात रस्त्याने येणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. प्रयागराजकडे जाणारा प्रत्येक रस्ता अनेक किलोमीटरपर्यंत जाम असतो. लोकांना १२ ते २४ तास स्वत:च्या गाडीत बसावे लागते. गाड्यांमध्येही प्रचंड गर्दी असते. दरम्यान, प्रयागराजच्या आठही स्थानकांवर सर्व काही अत्यंत व्यवस्थित सुरू असल्याचा दावा खुद्द रेल्वेच्या वतीने मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केला आहे. लोकांनी अफवांकडे लक्ष देऊ नये, असे आवाहन त्यांनी केले. याआधी प्रयागराज जंक्शन स्टेशन बंद झाल्याची बातमी पसरली होती. प्रयागराज संगम स्थानक केवळ बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले. याचे कारणही सांगण्यात आले.

प्रयागराजमधील आठही स्थानकांवर महाकुंभात येणाऱ्या लोकांना अत्यंत पद्धतशीरपणे हाताळले जात आहे, अशी माहिती रेल्वेमंत्री पियुष गोयल यांनी सोमवारी दिली. राज्य सरकार आणि मेळा प्रशासनासोबत चांगले काम सुरू आहे. मेळा प्रशासनाच्या मदतीने रविवारी प्रयागराज जंक्शनवरून ३३० गाड्या सोडण्यात आल्या आहेत. आजही सर्व काही अतिशय व्यवस्थित पणे सुरू आहे. अफवांकडे लक्ष देऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

# ...तर आम्ही निवडणुका कशा लढवायच्या?- संजय राऊत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**राजकारण**

**मुंबई :** शिवसेना (उबाठा) खासदार संजय राऊत यांनी सोमवारी पुन्हा भाजपावर निशाणा साधला. दिल्ली विधानसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर आता भाजपानं दिल्ली विधानसभा निवडणूकही जिंकली आहे. दिल्लीत देखील मोठ्या प्रमाणात मतदार याद्यांमध्ये घोटाळा झालाय. ईव्हीएम मशीनमध्ये घोळ झालाय. अरविंद केजरीवाल यांना त्यांच्याच मतदारसंघात अपेक्षित मतं मिळाली नाहीत. हळूहळू देशातील सर्व राज्ये भाजपा जिंकत आहे. त्यामुळं सर्व यंत्रणा भाजपाच्या हातात असल्यामुळं आम्ही लोकसभा निवडणूक कशी लढवायची? असा सवाल संजय राऊतांनी केलाय.

आघाडीसंदर्भात बोलताना राऊत म्हणाले, इंडिया आघाडी केवळ निवडणुकीसाठी एकत्र दिसता कामा नये. तर इंडिया आघाडीनं सामान्यांचे प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरायला हवं. आज इंडिया आघाडी केवळ संसदेत दिसत आहे. इंडिया आघाडीतील काँग्रेस हा आमचा मोठा भाऊ आहे.

# रशिया आणि अमेरिकेच्या लढाऊ विमानांचे एकत्रित उड्डाण

## एरो इंडिया'

### आशियातील सर्वात मोठा एअर शोचा प्रारंभ

**आशियातील सर्वात मोठा एअर शो'एरो इंडिया'आजपासून बेंगळुरूच्या येलहंका एअर बेसवर सुरू झाला आहे. त्याचे उद्घाटन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते झाले. या प्रतिष्ठेच्या एअर शोची ही १५ वी आवृत्ती आहे. यावेळी हे विशेष आहे कारण यात अनेक दुर्मिळ दृश्ये आहेत.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कट्टर प्रतिस्पर्धी देश रशिया आणि अमेरिकेची स्टेल्थ लढाऊ विमाने पहिल्यांदाच आमने-सामने आली. एअर शोचे व्हिडिओही समोर आले आहेत, ज्यात रशियन लढाऊ विमान एसयू-५७ हवाई तळावरून उड्डाण करताना दिसत आहे. एका फोटोत अमेरिका आणि रशियाची सर्वात हायटेक लढाऊ विमाने एकाच फ्रेममध्ये उभी असल्याचे दिसत आहे.

रशियन एसयू-५७'फेलॉन' आणि अमेरिकन एफ-३५'लाइटनिंग २'ही जगातील सर्वात प्रगत पाचव्या पिढीची लढाऊ विमाने मानली जातात. ही दोन्ही लढाऊ विमाने या शोचा भाग आहेत. जागतिक संरक्षण सहकार्यासाठी ही एक"महत्त्वपूर्ण उपलब्धी" आहे आणि हवाई वाहतूक प्रेमींसाठी एक रोमांचक अनुभव देखील आहे. या अद्भुत दृश्याची मजा फक्त भारतीय भूमीतच पहायला मिळत आहे. सुखोई-५७ आणि एफ-३५ ही विमाने चार दिवस दररोज हवाई प्रदर्शनात सहभागी होतील.



### रोमांचक उड्डाण

● एअरो इंडिया २०२५ सुरू होण्याच्या एक दिवस आधी भारतीय हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल एपी सिंह आणि लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी तेजस लढाऊ विमानातून उड्डाण केले. जनरल द्विवेदी यांनी हा त्यांच्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षण असल्याचे म्हटले आहे.




“मी हेच सांगत आलो आहे. बघा, जर एखाद्या खेळाडूने दीर्घकाळ क्रिकेट खेळले असेल आणि त्याने वर्षानुवर्षे धावा केल्या असतील, तर ही काही साधी गोष्ट नाहीय. मी खूप काळापासून क्रिकेट खेळत आहे. मला माहित आहे की मला काय करायचं आहे आणि मी आज तेचं केलं.” “माझ्या डोक्यात फक्त मी ज्या पद्धतीने इतकी वर्ष खेळत आलो आहे, तसंच खेळायचं हे होतं. मी जशी फलंदाजी करत आलो आहे तशी फलंदाजी करण्याचं डोक्यात सुरू होतं. मी सांगितल्याप्रमाणे गेली अनेक वर्ष मी खेळत आहे त्यामुळे एखाद दुसऱ्या डावात मी अपयशी झाल्याने माझं मत माझी खेळण्याची पद्धत माझं मत बदलू शकत नाहीत. हा दिवस इतर दिवसांसारखाच होता.” “आम्हाला आमची जबाबदारी पार पाडायची असते आणि ती म्हणजे मैदानावर जाऊन खेळणं. दिवसाच्या अखेरीस जेव्हा आपण झोपायला जातो आणि तेव्हा आपल्याला जाणवतं की आपण आपली कामगिरी चोख बजावली आहे. — रोहित शर्मा

# उमेश गुप्ता महाराष्ट्र श्री

## गतविजेत्या हरमीत सिंगवर केली मात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मूर्ती छोटी, पण किर्ती महान. अवघ्या सव्वा पाच फूट उंचीच्या मुंबई उपनगरच्या उमेश गुप्ताने गतविजेत्या हरमीत सिंग आणि कमलेश अच्चरा या आपल्यापेक्षा वजनदार असलेल्या शरीरसौष्ठवपटूंवर मात करत प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र श्रीवर आपल्या नावाची मोहोर उमटवली. महिलांच्या शरीर सौष्ठव स्पर्धेत मुंबई उपनगरच्याच रेखा शिंदेने बाजी मारली. गेल्यावर्षीही तिनेच मिस महाराष्ट्रचा मान मिळवला होता. पुरुषांच्या फिजीक स्पोर्ट्स प्रकारात पुण्याच्या नरेंद्र व्हाळेकर आणि शुभम पवार यांनी अव्वल स्थान पटकावले. चार गटात सुवर्णपदक पटकावणाऱ्या मुंबई उपनगरच्या खेळाडूंनी सांघिक विजेतेपदाचाही मानही संपादला

पुण्यातील थेऊर येथील श्री चिंतामणी मंदिराच्या प्रांगणात झालेल्या महाराष्ट्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धेत गणेश आणि क्रीडाभक्तांना पीळदार थराराचा अनुभव घेता आला. चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्ससाठी स्टेजवर नऊही गटविजेते उतरले तेव्हा सर्वांचा नजरा कमलेश अच्चरा आणि हरमीत सिंगकडे वळल्या होत्या. या दोघांपुढे उंचीने कमी असलेला उमेश गुप्ता पीळदार वाटत होता. त्याची उंची, त्याच्या स्नायूंचे आकारमान निश्चित कमी होते, पण त्याच्या आखीवरेखीवपणा आणि पीळदारपणाने त्याला महाराष्ट्राच्या शरीरसौष्ठवाचे ऑस्कर जिंकून दिले. विशेष म्हणजे गेल्यावर्षी झालेल्या महाराष्ट्र श्री स्पर्धेत त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. मात्र यंदा त्याने आपले गेले अपयश धुवून काढताना महाराष्ट्र श्रीचा मान पटकावला. महाराष्ट्रातील शरीरसौष्ठवपटूंसाठी सर्वात प्रतिष्ठेच्या या स्पर्धेत १६० पुरुष शरीरसौष्ठवपटूंसह फिजीक स्पोर्ट्सचे ५५ स्पर्धक आणि महिलांच्या गटातील १२ पीळदार सौंदर्यवती असे एकंदर २२७ स्पर्धकांनी मंचावर उतरून महाराष्ट्राची ताकद दाखवली.

या दिमाखदार स्पर्धेत विजेत्यांवर तब्बल दहा लाखांच्या रोख पुरस्कारांचा वर्षाव करण्यात आला. पुरस्कार सोहळा आयोजक नवनाथ काकडे, आमदार राहुल कूल, आमदार ज्ञानेश्वर कटके, आमदार बापूसाहेब पठारे, आयबीबीएफचे व एबीबीएफचे सरचिटणीस डॉ.संजय मोरे, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे सरचिटणीस अजय खानविलकर, खजिनदार सुनील शेगडे, राजेश सावंत, राजेंद्र सातपूरकर, नरेंद्र कदम, विशाल परब यांच्या उपस्थितीत पार पडला

# संजू सॅमसन सारखीच ऋषभ पंतची अवस्था होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** रोहित शर्माचा फॉर्म परतला, अक्षर पटेलची अष्टैपलू कामगिरी अन् सातत्य... आपल्याला इंग्लंडविरुद्धच्या वन डे मालिकेत पाहायला मिळालं. भारतीय संघाने तीन सामन्यांच्या वन डे मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे आणि तिसरा सामना जिंकून चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेपूर्वी प्रतिस्पर्धी संघाच्या मनात धडकी भरवण्याचं लक्ष्य टीम इंडियाला खुणावतंय. पण, इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत ऋषभ पंतला अजूनही प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळालेली नाही आणि १२ फेब्रुवारीला होणाऱ्या लढतीत तो खेळताना दिसेल, याची शक्यताही नाही. टीम इंडियाचे हे डावपेच ऋषभ पंतच्या चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळण्याच्या मनसुब्यावर पाणी फिरवत आहेत. त्यामुळेच संजू सॅमसनसारखी ( Sanju Samson) ऋषभची अवस्था होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

भारतीय क्रिकेट संघाने ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी ऋषभ पंत व संजू सॅमसन अशा दोन यष्टिरक्षक-फलंदाजांची निवड केली होती. पण, संजूला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही आणि तो संपूर्ण स्पर्धेत बाकावर बसलेला दिसला. संजूला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या फायनल लढतीत संधी मिळणारच होती, परंतु कर्णधार रोहित शर्माने विचार बदलला.

ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत जे संजू सॅमसनसोबत जे घडलं, ते ऋषभसोबत चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत घडताना दिसण्याची शक्यता आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघाने जाहीर केलेल्या १५ सदस्यीय संघात लोकेश राहुल व ऋषभ अशा दोन यष्टिरक्षकांची निवड केली गेली आहे. या संजूला या संघातून वगळले गेले आहे. लोकेश राहुल हा भारतासाठी पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करतो, परंतु वन डे वर्ल्ड कप स्पर्धेपासून त्याच्याकडे यष्टिरक्षकाचा अतिरिक्त भार दिला गेला आहे.

# महाराष्ट्राचा सुदेष्णा वेगवान धावपटू, संजीवनीला सुवर्ण



**पुणे :** नाशिकची खेळाडू संजीवनी जाधव हिने दहा हजार मीटर्स धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकून ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिला दिवस गाजविला. सातारा येथील खेळाडू सुदेष्णा शिवणकर हिने वेगवान धावपटूचा मान मिळविला, तर पुरुषांच्या गटात पुण्याचा खेळाडू प्रणव गुरव याला शंभर मीटर्स धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक मिळाले. राजीव गांधी क्रीडा संकुलातील गंगा आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स स्टेडियमवर आज या स्पर्धेचा पहिला दिवस महाराष्ट्राच्या दृष्टीने आनंददायी ठरला. सुदेष्णा शिवणकर हिने 100 मीटर धावण्याची शर्यत ११.७६ सेकंदात जिंकली. प्रणव गुरव याने शंभर मीटर्स धावण्याची शर्यत १०.३२ सेकंदात पार केली. त्याला अगदी थोडक्यात सुवर्णपदकाने हुलकावणी दिली. महिलांच्या दहा हजार मीटर शर्यत संजीवनी हिने ३३ मिनिटे ३३.४७ सेकंद या वेळेत पूर्ण केले. या शर्यतीमध्ये सुरुवातीपासूनच तिने आघाडी घेतली होती. आणि शेवटपर्यंत तिने ही आघाडी कायम ठेवली. किंबहुना शेवटच्या टप्प्यात तिने साडेतीनशे मीटर्सची आघाडी घेतली होती. तिचे या स्पर्धेतील हे दुसरे सुवर्ण पदक आहे. यापूर्वी तिने याच क्रीडा प्रकारात एक रौप्य व एक सुवर्णपदक जिंकले होते.

# साची सुपरकिंग्ज्, रूद्र वॉरीयर्स संघांची विजयी घौडदौड

**पुणे :** लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डी२ तर्फे आयोजित ‘लायन्स् प्रीमियर लीग’ २०२४-२५ टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत साची सुपरकिंग्ज् संघाने सलग दुसरा तर, रूद्र वॉरीयर्स संघाने आपल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून स्पर्धेत शानदार विजयी सलामी दिली. सहकानगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूलच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सागर कांबळे याने फटकावलेल्या ६५ धावांच्या जोरावर रूद्र वॉरीयर्स संघाने एसके वॉरीयर्स संघाचा ९१ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना रूद्र वॉरीयर्सने १९.१ षटकात १८४ धावांचे आव्हान उभे केले. सागर कांबळे याने ३७ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांसह ६५ धावांची खेळी केली. त्याला हृषीकेश आगाशे याने ४३ धावांची खेळी सुरेख साथ दिली. या आव्हानाचा पाठलाग करताना एसके वॉरीयर्स संघाचा डाव १६.५ षटकामध्ये ९३ धावांवर आटोपला. गोलंदाजीमध्ये रूद्र संघाच्या सौरभ रवालिया याने ३ गडी बाद केले. याशिवाय अमित गणपुले आणि संतोष पाटोले यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. संतोषकुमार सांगळे याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर साची सुपरकिंग्ज्ने योगेश व्हिक्टर्स संघाचा ६ गडी राखून सहज पराभव केला. संतोषकुमार याने १८ धावांमध्ये पाच गडी बाद करताना योगेश व्हिक्टर्स संघाचा डाव ११९ धावांवर गुंडाळला. हे लक्ष्य साची सुपरकिंग्ज्ने १६.५ षटकात पूर्ण केले. डावामध्ये जयराज गौड याने ४५ धावांची तर, हिकांत कामदार याने ४१ धावांची खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला.

# पंजाबच्या मच्छवाडाने मारले कुंडलचे मैदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**कुंडल :** येथील ऐतिहासिक महाराष्ट्र कुस्ती मैदानात प्रथम क्रमांकाची कुस्ती पंजाबच्या गौरव मच्छवाडा याने जिंकली. ‘महाराष्ट्र केसरी’ हर्षल सदगीर विरुद्ध गौरव मच्छवाडा (पंजाब) अशी कुस्ती झाली. गौरव मच्छवाडाने ११ व्या मिनिटाला हर्षल सदगीरला हफ्ता डावावर चितपट केले.

येथील ऐतिहासिक महाराष्ट्र मैदानावर लोकवर्गणीतून कुस्त्यांची परंपरा आहे. यंदा मैदानाचे १०४ वे वर्ष होते. विविध चटकदार कुस्त्यांमुळे शौकिनांचे समाधान झाले. प्रथम क्रमांकाच्या लढतीत हर्षलने दुसऱ्या मिनिटाला पट घेत गौरवला खाली खेचले. त्याने यशस्वीपणे सुटका करवून घेतली. दोन्ही पैलवानांत खडाखडी झाली. शौकिनांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी लढत झाली.

माऊली जमदाडे विरुद्ध प्रिन्स कोहली यांच्यात झालेली लढत चौथ्या मिनिटाला प्रिन्स कोहलीने माऊलीवर घिस्सा डावावर विजय मिळवला. महेंद्र गायकवाड विरुद्ध प्रकाश बनकर यांच्यातील कुस्ती महेंद्र गायकवाडने पुट्टी डावावर दहाव्या मिनिटाला जिंकली. दादा शेळके विरुद्ध लल्लू जम्मू यांच्यातील कुस्ती ३० मिनिटांनी गुणावर लावण्यात आली. दादा शेळके आक्रमक झाला. दुसऱ्या मिनिटाला तो गुणांवर विजयी झाला. यांसह अन्य कुस्त्याही चटकदार झाल्या. रविराज चव्हाण विरुद्ध अभिनव नायक लढत प्रेक्षणीय झाली. अभिनवने ‘छडी टांग’ करत रंगत आणली.

# क्रीक ९ क्रिकेट अकादमीची शिळीमकर स्पोर्टस अकादमी वर मात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणी यांच्या वतीने आयोजित लायन्स क्लब करंडक १६ वर्षाखालील कसोटी क्रिकेट स्पर्धेत आर्य कुमावत (६-४४ व ५-८०) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर क्रीक ९ क्रिकेट अकादमी संघाने शिळीमकर स्पोर्टस अकादमी संघाचा ७५ धावांनी पराभव शानदार विजय मिळवला.

फोर स्टार ग्राउंड हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी डीव्हीसीए संघाने ५० षटकात 4बाद २७८ धावापासून खेळ पुढे सुरू झाला.तत्पूर्वी काल डीव्हीसीए च्या रूद्र पाटील(४-८), प्रज्योत गुंडाळे(२-१४), रुहुल्ला नदाफ(२-१७)यांनी केलेल्या सुरेख गोलंदाजीपुढे चोंधे पाटील क्रिकेट अकादमीचा डाव २९.२षटकात सर्व बाद ५६धावावर संपुष्टात आला.





याच्या उत्तरात डीव्हीसीए संघाने ६२षटकात ८बाद ३४०धावा केल्या. यात ओम पाटीलने १३५चेंडूत १३चौकाराच्या मदतीने १०८, अभिषेक टोपनोने ६२, प्रज्वल मोरेने ७९, श्रेयस गायकवाडने नाबाद ५२ धावा, श्रावण राठोडने नाबाद १७ धावा केल्या. सामना अनिर्णीत राहिल्यामुळे डीव्हीसीए पहिल्या डावाच्या आघाडीवर २४३ धावांनी विजय मिळवला.

दुसऱ्या सामन्यात दुसऱ्या दिवशी प्रथम फलंदाजी करताना क्रीक ९ क्रिकेट अकादमी संघाने ८२ षटकात सर्वबाद २४१ धावाकेल्या. याच्या उत्तरात शिळीमकर स्पोर्टस अकादमी संघ ३४.३षटकात सर्वबाद १२२ धावावर संपुष्टात आला. यात अर्णव मढे ३५, प्रथमेश राऊत ५९ यांनी धावा केल्या. क्रीक ९ क्रिकेट अकादमीच्या आर्य कुमावतने ४४ धावांत ६ गडी बाद करून संघाला पहिल्या डावात ११९ धावांची आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या डावात श्रेय असलेकर ६८, आरी कुमावत नाबाद २८, अंगद ठाकूर १६ यांनी केलेल्या धावांच्या जोरावर क्रीक ९ क्रिकेट अकादमी संघाने २६ षटकात ४ बाद १२० धावा करून आपला डाव घोषित केला. विजयासाठी २३९ धावांचे आव्हान घेऊन उतरलेल्या शिळीमकर स्पोर्टस अकादमी संघ २६.२ षटकात सर्व बाद १६४ धावावर कोसळला. यात श्रेयस हेकरे ७३, कृष्णा गायकवाड २९, आरुष गुप्ता १८ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. विजयी संघाकडून आर्य कुमावत(५-८०), विहान परब(२-२९) यांनी संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

# एमआयटी-एडीटीला 'खेलो इंडिया'साठी 'साई'ची मान्यता



**पुणे :** येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाला रोइंग या क्रीडा प्रकारासाठी प्रतिभावान खेळाडूंचा (मुले व मुली) शोध घेणे व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) कडून खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र (निवासी) म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे, क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठित 'साई'ची मान्यता मिळणारे एमआयटी एडीटी विद्यापीठ हे राज्यातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे. एमआयटी एडीटी विद्यापीठातील क्रीडा संकुल हे जागतिक सोईसुविधांनी सुसज्ज आहे. विद्यापीठातील डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी स्पोर्ट्स अकादमीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षकांकडून रोइंग, बॉक्सिंग व जलतरण या खेळांसाठी अकादमीची स्थापना करत खेळाडूंना प्रशिक्षणाचे काम केले जाते. त्याच्या परिणामतः रोइंग अकादमीतील खेळाडूंनी आजवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना पदक जिंकूण विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. गतवर्षी विद्यापीठातील स्कूल ऑफ लॉ'चे प्रा.आदित्य केंदारींनी आशियाई इनडोअर रोइंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविले होते. या कामगिरीनंतर विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड म्हणाले, विद्यापीठाच्या रोइंग अकादमीला आता खेलो इंडियासाठी साईची मान्यता मिळाल्याने या क्रीडा प्रकारात रुची असणाऱ्या पुणे व परिसरातील खेळाडूंना या खेळाच्या प्रशिक्षणासाठी हक्काचे ठिकाण उपलब्ध होणार आहे. या यशानंतर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभागाचे संचालक प्रा.पद्माकर फड यांनी क्रीडा विभागाचे अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये महाराष्ट्राच्या श्रावणीचा डबल धमाका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील मॉडर्न पेंटॅथलॉन प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकाची हॅटट्रिक झळकवली. ट्रायथले प्रकारातील वैयक्तिक व मिश्र रिले प्रकारात श्रावणी नीलवर्ण याने सुवर्ण पदकाचा डबल धमाका केला. पाठोपाठ श्रावणीसह मयांक चाफेकरने मिश्र दुहेरीत सुवर्ण व वैयक्तिक प्रकारात कांस्य पदकांची कमाई केली.

गौलापार येथे सुरू असलेल्या मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये हरियाणाच्या प्रतिस्पर्धींना मागे टाकून पुण्याची 16 वर्षीय श्रावणी नीलवर्णने सलग दोन सुवर्ण पदके जिंकून आजचा दिवस गाजविला. 18.57.27 मिनिटांत ट्रायथले शर्यत पूर्ण करून महिलांच्या वैयक्तिक प्रकारात श्रावणी नीलवर्णाने महाराष्ट्राचे वर्चस्व प्रस्थापित केले. याच प्रकारातील मिश्र रिले प्रकारात ' जय महाराष्ट्रा'चा जल्लोष दिसून आला. हरियाणा व गोवा संघाच्या जोडीला मागे टाकून श्रावणी नीलवर्ण व मयांक चाफेकर यांनी बाजी मारली. त्यांनी 18.20.45 मिनिटांत शर्यत पूर्ण करून अव्वल स्थान पटकवले. जितेंद्र खासनीस यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या श्रावणीने पर्दापणातच सुवर्ण यश संपादन केले आहे. दहावीच्या परिक्षेचा त्राण असतानाही जिद्दीने सराव करून पदक जिंकण्याचा करिश्मा श्रावणीने केला आहे.

ट्रायथलॉन शर्यतीत पुरूषांच्या वैयक्तिक प्रकारात महाराष्ट्राने दिवसातील सलग तिसरे पदक जिंकले. ठाणेच्या मयांक चाफेकरने 16.34.10 मिनिटांत शर्यत पूर्ण करीत कांस्य पदक संपादन केले. यजमान उत्तराखंडच्या आदित्य नेगीने सुवर्ण तर हरियाणाच्या बसंत तोमरने रौप्यपदक जिंकले.

# धक्कादायक : पदकविजेत्या पॉवरलिफ्टरवर झाडल्या ५ गोळ्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सोनीपतच्या प्रगती नगरमध्ये रविवारी एक भयंकर प्रकार घडला. बाईक पार्किंगच्या वादावरून झालेल्या भांडणात राष्ट्रीयपदक विजेत्या पॉवरलिफ्टरची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. २० वर्षीय वंश याच्यावर पाच गोळ्या झाडण्यात आल्या. वंश त्याच्या ओळखीच्या एका मुलीच्या घरी डेटा केबल गोळा करण्यासाठी गेला होता आणि तिच्यासमोर हा प्रसंग घडला.

वंशने मुलीच्या शेजाऱ्याच्या घराजवळ बाईक पार्क केली होती आणि त्यावरून हा वाद झाल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी मृतदेह सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ठेवला आहे. सोनीपत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वंश सोनीपतमधील प्रगती नगरमध्ये त्याच्या मैत्रिणींना भेटण्यासाठी आला होता आणि त्याने त्याची बाईक रस्त्यावर पार्क केली. शेजारी जेव्हा आला तेव्हा त्याने त्यावरून भांडण केलं आणि शाब्दिक बाचाबाचीने हिंसक वळण घेतलं.

मूळचा सरगाथल गावचा रहिवासी असलेला वंश काकरोई रोडवरील विकास नगरमध्ये पदवीचे शिक्षण घेत होता. तो विकास नगरमध्ये एक दूध डेअरी देखील चालवत होता. तो बेंच प्रेसमध्ये राष्ट्रीय स्तरावरील पॉवरलिफ्टर होता. रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास, तो त्याच्यासोबत जिमला जाणाऱ्या एका मुलीसोबत प्रगती नगर येथील तिच्या घरी गेला.

# कोल्हापुरच्या शुभम शिदनाळे व अपेक्षा पाटील; हवेलीच्या सुरज चोरघे यांनी पटकावले विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हिंदू गर्जना प्रतिष्ठान आणि पुनित बालन ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘हिंदू गर्जना चषक’ महिला व पुरूष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत खुल्या गटामध्ये कोल्हापुरच्या शुभम शिदनाळे याने तर, कुमार गटामध्ये हवेली सुरज चोरघे तसेच महिला गटामध्ये कोल्हापुरच्या अपेक्षा पाटील यांनी विजेतेपद संपादन करून मानाची चांदीची गदा पटकावली.

टिळक रोड येथील स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर तयार करण्यात आलेल्या स्व. धनंजय रामचंद्र घाडे क्रीडानगरीमध्ये झालेल्या स्पर्धेच्या खुल्या गटाच्या अंतिम फेरीमध्ये शुभम याने उपांत्य फेरीमध्ये गतवेळचा महाराष्ट्र केसरी याचा सिकंदर शेख याचा ६-२ अशा गुणफरकाने पराभव करून मुळशीच्या तानाजी झुंझुरगे समोर आपले आव्हान निर्माण केले होते. अंतिम सामना हा निकाली कुस्ती घेण्यात येणार असल्याने दोन्ही कुस्तीपटूंनी सुमारे तासभर (५२ मिनिटे) जोरदार खेळ करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर सहा मिनिटांची गुणांची लढत खेळण्याचा निर्णय पंचांनी घेतला. तासभर दमल्यानंतर लढल्या गेलेल्या कुस्तीमध्ये शुभमने आपल्या आडदांड शरीरयष्टीच्या जोरावर तानाजीचा १०-१ अशा गुणफरकाने सहज पराभव करून विजेतेपदावर आपले नाव कोरले.

## पर्वती हिल क्लाइंबिंग स्पर्धा २०२५ स्पर्धेत

# ओंकार, भूमिका, इसाक, साक्षी, अनुष्का यांना विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवक्षितिज संस्थेच्या वतीने आयोजित पर्वती हिल क्लाइंबिंग २०२५ स्पर्धेत ओंकार झोरे, भूमिका परिवार, इसाक शीग, साक्षी सुतार, प्रणव पालवे, अनुष्का रिसबूड, प्रांशूल यादव, अंशुल सोनाकर, आकांक्षा पेडगावकर, शंतनू आष्टीकर यांनी अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

नवक्षितिज ही प्रौढ मतिमंद व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेली संस्था पर्वती टेकडी चढण्याची स्पर्धा दरवर्षी आयोजित करते. २००९ पासून



सुरू झालेला हा विशेष कार्यक्रम शारीरिक तंदुरूस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी, स्पर्धकांना नवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी आणि मतिमंद व ऑटिझम असलेल्या व्यक्तींमध्ये वैयक्तिक प्रगती साधण्यासाठी आयोजित केला जातो. स्पर्धेत ३० हून अधिक संस्थांचे प्रतिनिधी आणि ३०० हून अधिक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला होता.

स्पर्धेत ६ ते १२ मुलांच्या गटात छत्रपती प्रतिष्ठानच्या ओंकार झोरे(०२.१०से) वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला. तर, मुलींच्या गटात सेवासदन दिलासा केंद्रच्या भूमिका परिवार(०२.१६से) हिने प्रथम क्रमांक पटकावला. १३ ते १८ वयोगटात मुलांच्या गटात इसाक शीग (०२.०४से) याने विजेतेपद पटकावले. याच मुलींच्या गटात सेवासदन दिलासाच्या साक्षी सुतार(०२.१९से, ) हिने विजेतेपद मिळवले. १९ ते ३० मध्ये मुलांच्या गटात छत्रपती प्रतिष्ठानच्या प्रणव पालवे(१५.१०से), मुलींच्या गटात नवक्षितिज मारुंजीच्या अनुष्का रिसबूड(१६.०२से) यांनी, ३१ ते ४५ वयोगटात मुलांच्या गटात स्वाभिमान संस्थेच्या प्रांशूल यादव(०५.०२से,), मुलींच्या गटात विद्या लवाटे(०५.१२से) यांनी विजेतेपदाला गवसणी घातली. ४५ वर्षावरील पुरुष गटात शंतनू मुळे(०७.०२से) याने तर, महिला गटात सुनीता पाटील(०७.१२से) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.